। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २२४ वा । शुक्रवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## नगरपालिका -नगरपंचायत निवडणुका

## ठरलेल्या वेळेनुसार होणार

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवरून सुरू असलेल्या वादाला शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाचा टप्पा पार पडला. राज्यातील काही नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण दिल्याबाबत दाखल याचिकांवर सुनावणी घेण्यात आली. आरक्षण मर्यादा ओलांडल्याचा मुद्दा गंभीर असल्याने सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे वर्ग करण्यात यावे, असा निर्णय दिला आहे. पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार असून, तेव्हा या प्रकरणाची सविस्तर तपासणी केली जाणार आहे.

दरम्यान, निवडणुकांना स्थगितीची मागणी याचिकाकर्त्यांकडून करण्यात आली होती, मात्र न्यायालयाने ती नामंजूर केली आहे. त्यामुळे राज्यातील २८८ नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियेला हिरवा कंदील मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणुका वेळेत पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोग सज्ज आहे. न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, ज्या ठिकाणी आरक्षण मर्यादा ओलांडली गेली आहे, त्या ठिकाणी निवडणुका आदेशाधीन राहतील.

या सुनावणीनंतर राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा रंगू लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हा राजकारणातील पहिला टप्पा मानला जातो आणि त्यामुळे सर्व पक्ष या निवडणुकांकडे विशेष लक्ष देत आहेत. ओबीसी आरक्षण हा प्रमुख मुद्दा असून, या विषयावरून विरोधक आणि सत्ताधारी आमनेसामने आहेत. आता २१ जानेवारीला न्यायालयाचा पुढील निर्णय काय येतो, याकडे राज्यातील लाखो मतदार आणि राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. शुक्रवारी या प्रकरणी महत्त्वाची सुनावणी झाली असून, राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांना स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला. २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींमध्ये उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, अनेक ठिकाणी थेट लढती रंगल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे आजचे मत राज्याच्या राजकीय वातावरणावर मोठा परिणाम घडवू शकते. जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकींना स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला असला तरी हा निकाल अंतिम निर्णयाच्या अधीन असेल असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जानेवारीला होणार आहे.

मंगळवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांना स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र, राज्य निवडणूक आयोगानेही कोर्टात कबुली दिली की ४० नगरपरिषद व १७ नगरपंचायतींमध्ये ५०% आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. त्यामुळे संतुलित आरक्षण रचनेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. संविधानात आरक्षणाची कमाल मर्यादा ५०% निश्चित असल्याने, आयोगाकडून केलेल्या अद्ययावत अहवालानंतर कोर्टाचे आदेश निवडणूक प्रक्रियेला वळण देऊ शकतात, अशी शक्यता व्यक्त होत असतानाच न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता उमेदवारांना आणि राज्य सरकारलाही मोठा दिलासा मिळाला आहे.

या याचिकेवर विकास गवळी यांनी न्यायालयात आक्षेप नोंदवला आहे.



त्यांचे म्हणणे आहे की, राज्य सरकारने काही ठिकाणी ओबीसी व इतर घटकांना जास्त प्रमाणात आरक्षण देत घटनात्मक रेषा ओलांडली आहे. दुसरीकडे, राज्य सरकार मात्र बांठिया आयोगाचा अहवाल दाखवत आपण कायद्याच्या चौकटीत राहूनच आरक्षण निश्चित केले असल्याचा दावा करत आहे. या दोन बाजूंच्या युक्तिवादावर न्यायालयाने निर्णय दिला आहे.

मंगळवारीच्या सुनावणीत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी राज्याला अधिक वेळ देण्याची विनंती केली होती. त्यावर याचिकाकर्त्यांनी जोरदार आक्षेप घेतला की, निवडणुका जाहीर झाल्या आहेत, अर्ज भरून झाले आहेत आणि आता वेळ कशासाठी? कोर्टाने कोणतेही मत नोंदवण्याचे टाळले मात्र, अंतिम आदेशाच्याच चौकटीत निवडणुका होतील, अशी टिप्पणी केली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने १ लाख दिव्यांगांना कृत्रिम अवयव वितरण

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी सर्व सुविधा मिळवून देण्याकरिता शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न आहेत. समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्याचे शासनाचे ध्येय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व रतननिधी फाऊंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यक साधन वितरण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाद्वारे १ लाख दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, हा अभिनव प्रकल्प दिव्यांग पुनर्वसनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने त्यासाठी अधिक प्रभावी कार्यवाही केली जात आहे . या उपक्रमाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनवणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे हा आहे. कृत्रिम हात, पाय, श्रवणयंत्रे, व्हीलचेअर्स आणि इतर सहाय्यक उपकरणे यांचा समावेश असलेला हा वितरण कार्यक्रम राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. रतननिधी फाऊंडेशनने राज्यातील बीड, चंद्रपूर, जळगाव, सोलापूर, पालघर, मुंबई, गडचिरोली, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अकोला, परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये २९,४९६ सहाय्यक साधनांचे (जयपूर फूट, पोलिओ कॅलिपर्स, कृत्रिम हात व काठी) वितरण करून सुमारे २६ हजार दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन केले आहे.

जागतिक स्तरावर सुमारे १५ टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे, तर भारतात हा आकडा सुमारे २.२ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर रतननिधी फाऊंडेशनचा मोबिलिटी प्रकल्प दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्याची उर्मी देणारा, आत्मविश्वास मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूक मतदान मतमोजणी दिवशी मद्यविक्री राहणार बंद

**लातूर/प्रतिनिधी** : राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, निलंगा आणि औसा या चार नगरपरिषदा व रेणापूर नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर,२०२५ रोजी मतदान होणार असून मतमोजणी ३ डिसेंबर, २०२५ रोजी होणार आहे. मतदानाच्या अगोदरचा एक दिवस आणि मतदानाचा दिवस म्हणजेच १ व २ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित नगरपरिषद आणि नगरपंचायत हद्दीतील सर्व अबकारी अनुज्ञप्त्या बंद राहतील. तसेच मतमोजणी दिवशी म्हणजेच ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणाऱ्या ठिकाणची मद्यविक्री बंद राहणार आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, मद्यविक्री नोंदवही इ.) नियम १९६९ च्या संबंधित कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुध्द महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ व त्या अंतर्गत असलेल्या नियमांतर्गत तरतुदीनुसार कडक कारवाई केली जाईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

## लातुरात मुलींचा लैंगिक छळ; पालकांचा शाळेमध्ये ठिय्या: शिक्षिकेसह तिघांविरोधात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल!



**लातूर/प्रतिनिधी** : सकाळी शाळेत आलेल्या १५ वर्षांच्या मुलींसोबत शाळेतच अश्लील चाळे केल्याचा प्रकार शहरातील नांदेड रोडवर असलेल्या एका विद्यालयात समोर आला. या घटनेची माहिती शाळेच्या पर्यवेक्षकांना दिल्यानंतर त्यांनी मुलींना न्याय देण्याऐवजी 'तुझा विनयभंग झाला याचा तुझ्याकडे काय पुरावा?' असे म्हणत तिलाच दमदाटी केल्यामुळे विनयभंग करणाऱ्या शिक्षिका, क्लार्कसह तिघांविरोधात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्रय मार्तंडराव भुतमपल्ले हा शहरातील नांदेड रोडवर असलेल्या विद्यालयात क्लार्क म्हणून कार्यरत आहे. शाळेतील १५ वर्षांच्या मुली त्यांच्याकडे फॉर्म भरणे, शुल्क भरणे आदी कामासाठी जात असतात. अशा मुली त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांच्याशी नको तेथे हात लावणे, अश्लील आणि चावट बोलणे असा प्रकार मागील काही दिवसांपासून सुरू होता. या क्लार्कचा वाईट अनुभव आलेल्या एका मुलीने आपल्या मैत्रिणीला सांगितल्यानंतर दत्तात्रय भुतमपल्ले हा अन्य मुलींसोबतसुध्दा असेच चाळे करत असल्याचे समोर आले. त्यामुळे ८ ते १० मुलींनी हा प्रकार पालकांना सांगितला. घटनेची माहिती मिळताच संतप्त झालेल्या पालकांनी गुरुवारी (दि. २७) शाळेत येऊन संताप व्यक्त केला. शिक्षकांना आमच्या ताब्यात द्या, आम्हाला जाब विचारायचा आहे, असे म्हणत शाळेत गेलेल्या या पालकांना शाळेबाहेरच थांबवण्यात आले. यामुळे आणखी गोंधळ उडाला आणि पोलिसांना शाळेत बोलावण्यात आले.

> पालक आणि पोलिसांनी मुलींना धीर देत अधिक विचारपूस केली असता असा प्रकार गेल्या काही महिन्यांपासून सात मुलींसोबत घडल्याचे समोर आले आहे. याबाबत पोलिस अधिक कसून चौकशी करत आहेत. आतापर्यंत सात पीडित मुलींचे जबाब नोंदविले आहेत.
>
> **-समीरसिंह साळवे,**
> **डीवायएसपी, लातूर**

### शिक्षिकेसह पर्यवेक्षकाने मुलींकडेच मागितला पुरावा

मुलींशी अश्लील चाळे करणारा मुख्य संशयित दत्तात्रय मार्तंडराव भुतमपल्ले असला तरी यात शाळेतील एक शिक्षिका आणि पर्यवेक्षक या दोघांनाही संबंधितास साथ दिल्याचे समजते. मुलींचा लैंगिक छळ होत आहे याची कल्पना या दोघांना असतानाही त्यांनी मुलींनाच तुमचा विनयभंग झाला याचा तुमच्याकडे काय पुरावा आहे? असे म्हणत दमदाटी केल्याचे पीडित मुलींनी तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे या गुन्ह्यात अन्य दोघांनाही सहआरोपी करण्यात आले आहे. असे सांगण्यात आले.

पीडित मुलींनी दिलेल्या तक्रारीनंतर शाळेतील क्लार्क दत्तात्रय मार्तंडराव भुतमपल्ले याच्यासह विज्ञानाच्या शिक्षिका आणि शाळेचे पर्यवेक्षक अशा तिघांच्या विरोधात बाल लैंगिक अत्याचार कलमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तिघांनाही अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

या विद्यालयात संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत. असे असतानाही दत्तात्रय भुतमपल्ले हा मुलींना डेस्कवर जबरदस्तीने बसवून अश्लील चाळे करत असे. या संदर्भात पीडित मुलींनी लेखी तक्रार विज्ञान शिक्षिका कडे केली असल्याचे समजते. त्यामुळे यांनी मुलींना पर्यवेक्षकाकडे नेले. या वेळी या दोघांनीही पीडितांची बाजू ऐकून घेण्याऐवजी त्यांनाच दमदाटी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.असेही सांगण्यात येते. त्यामुळे सखोल चौकशीची गरज आहे. सत्य काय ते बाहेर आले पाहिजे अशी मागणी होत आहे.

## लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी परीक्षा होणार

**लातूर/प्रतिनिधी** : येथील जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता सहावी वर्गाच्या प्रवेश परीक्षेचे प्रवेश पत्र वेबसाइटवर उपलब्ध झाले असून ते डाउनलोड करून घेण्याचे आवाहन लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य गणपती मस्के यांनी केले आहे. ज्या पालकांनी आपल्या पाल्याचे अर्ज जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा इयत्ता सहावीसाठी ऑनलाइन पद्धतीने दाखल केले आहेत, त्यांची प्रवेश परीक्षा १३ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. तरी सर्व पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश पत्र वेबसाइट वरुन डाउनलोड करून घ्यावेत. प्रवेश पत्रावर दिलेल्या सूचनेप्रमाणे संबंधित परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्याला उपस्थित ठेवावे. याबाबत अधिक माहितीसाठी लातूर जवाहर नवोदय विद्यालय लातूर येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून ) संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य गणपती मस्के यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी केली औसा येथील मतदान केंद्रे व स्ट्राँगरुमची पाहणी

**लातूर/प्रतिनिधी** : औसा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी बुधवारी औसा शहरातील मतदान केंद्रे, स्ट्राँगरूम तसेच मतमोजणी कक्षाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत पुरवठा, सीसीटीव्ही कव्हरेज, व्हीलचेअर सुविधा, सुरक्षा यंत्रणा आदींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

निवडणूक आचारसंहितेचे कठोर पालन व्हावे, कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याबाबत स्थानिक प्रशासन व पोलीस यंत्रणेला स्पष्ट सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून मतदान प्रक्रिया पारदर्शक, शांततामय व सुरक्षित वातावरणात पार पाडावी, असे निर्देश दिले. तसेच शहरातील सर्व मतदारांनी २ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन केले.

यावेळी नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त अजितकुमार डोके, तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी घनश्याम अडसूळ, मुख्याधिकारी तथा सहाय्यक



निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी, पोलीस निरीक्षक आर. के. डमाले उपस्थित होते.

## जागतिक पुरुष नसबंदी पंधरवडा अंतर्गत जनजागृतीवर भर

**लातूर/प्रतिनिधी** : कुटूंब नियोजन हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण आहे. अद्यापही कुटूंब नियोजनाची जबाबदारी बऱ्याचदा स्त्रीलाच पार पाडावी लागते. कुटूंब नियोजनात पुरुषांच्या सहभागाला चालना देण्यासाठी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया व निरोधचा वापर याचे प्रमाण वाढविण्याच्या हेतूने जागतिक पुरुष नसबंदी पंधरवडा सर्व राज्यात साजरा करण्यात येतो. लातूर जिल्ह्यामध्ये २१ नोव्हेंबर, २०२५ ते ४ डिसेंबर, २०२५ या काळात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवाडा राबविण्यात येत आहे. यावर्षीचे या मोहिमेचे घोषवाक्य 'स्वास्थ व आनंदी कुटूंबाचे स्वप्न, पुरुषांच्या सहभागातून साकार' असे आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागामध्ये नसबंदीसाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया सर्व शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत केल्या जातात. तसेच लाभार्थ्यास प्रोत्साहनपर रुपये १ हजार ४५१ अनुदान दिले जाते. कुटूंब नियोजन कार्यक्रमावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी व कुटूंब नियोजन कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग वाढविण्यासाठी या पंधरवाडामध्ये जास्तीत जास्त पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



शेतकरी कर्ज वसुलीस एक वर्षाची स्थगिती...

### चिमटा

दयाचा



लातुरातील खड्ड्याविषयक समिती गठीत केली आहे !
आता लातूरशहर खड्डामुक्त होणारे आहे !!
आहे ते खड्डे बुजविण्याची गरज आहे !!!

## रेणापूरच्या नपं निवडणुकीत भाजपाला धनगर समाज संघर्ष समितीचा पाठिंबा

## पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्याकडून आ. कराड यांना पाठिंब्याचे पत्र

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर नगरपंचायत निवडणुकीसाठी धनगर समाज संघर्ष समितीच्या वतीने भारतीय जनता पार्टीला जाहीर पाठिंबा देण्यात आला असून धनगर समाज समितीचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांनी सदरील पाठिंब्याचे पत्र लातूर ग्रामीणचे आमदार भाजपाचे नेते श्री रमेशअप्पा कराड यांना सुपूर्द केले.

रेणापूर नगरपंचायतीच्या स्थापनेनंतर झालेल्या पहिल्या निवडणुकीत जनतेने भाजपाला सत्ता दिली. भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात मिळालेल्या संधीचे अभिषेक आकनगिरे यांनी सोने केले. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून विविध योजनेसाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आ. कराड यांनी मंजूर करून आणला आणि पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रेणापूर शहरात विविध विकास कामे मोठ्या प्रमाणात केली. त्यामुळे रेणापूर शहराचा चेहरा-मोहरा बदलला.

रेणापूर शहरातील सर्व समाज बांधवांना भाजपच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ मिळाला यापुढेही मिळत राहणार आहे. त्यामुळे धनगर समाज बांधवांनी भाजपच्या पाठीशी उभे राहून सर्वच उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी केले. प्रारंभी पासूनच धनगर समाज भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. यापुढेही समाजबांधव पक्षाची साथ सोडणार नाहीत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आगामी काळात भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या माध्यमातून आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली रेणापूर शहरात



मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार यात शंका नाही शासनाच्या विविध योजनेचा लाभ समाजातील सर्वच घटकांना मिळणार आहे. यामुळेच धनगर समाज संघर्ष समितीच्या वतीने भारतीय जनता पक्षाला पाठिंबा जाहीर करण्यात येत असल्याचे पत्रात नमूद केले आहे.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष अनिल पुजारी, भाजपा युवानेते अभिषेक आकनगिरे, अनिल गोयकर, हरिभाऊ काळे, बालाजी पवार, दत्ता सरवदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## आरोप-प्रत्यारोपाची मर्यादा ओलाडली

नगर परिषद व नगरपंचायच्या निवडणुकीत वैचारिक पातळी काही ठिकाणी सोडली जात असून आरोप-प्रत्यारोपाची मर्यादा ओलांडली आहे. असे चित्र सध्याला दिसून येत आहे. त्यात एका पक्षातून दुसऱ्यापक्षात जाणे सुरूच आहे. नाराज झाले की, दुसरा पक्ष आहेच, नैतिकता मुल्य विसरली जात आहेत. पुर्वीचे राजकिय कायकर्ते व सध्याचे, यात मोठा फरक दिसून येत आहे. मतदार सुद्धा कोणास उमेदवारी दिली व कसा सेवक असेल याबाबत चिंतन करीत नसल्याचे दिसून येत आहे. मुळात प्रचारास वेळ कमी दिसून येत आहे. प्रचारापेक्षा कार्यकर्ते या पक्षातून त्या पक्षात जाणे हा कार्यक्रम दिसून येत आहे. राजकारण हे समाजकारण मानले जात होते. सेवाभावीवृत्ती होती, आता मेवाखाई वृत्ती दिसून येत आहे. पुर्वी पक्ष संख्या कमी होती. आज त्यात वाढ दिसून येत आहे. सत्तेत एकाच पक्षाचे वर्चस्व होते आता तीन-तीन पक्षाचे सरकार आहे. काही दिवसापुर्वी दोन पक्षाची आघाडी किंवा युती होती. आता त्याची जागा महायुती व महाआघाडीने घेतली आहे. सत्ता टिकविण्यात वेळ जात असल्याने बाकीचे जनतेचे प्रश्न सोडविण्यात विलंब होताना दिसून येत आहे. जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक झाली तरच जनता आनंदी राहाते. सध्याला कामा पेक्षा दौरे दिसून येतात. त्यातही कोण व कधी कोणत्या पक्षात पदार्पन करेल याचा भरोसा दिसून येत नाही. राजकारणात एक समिकरण राहीले नाही. बदलते समिकरणामुळे जनतेत विश्वास कमी होताना दिसून येत आहे. राजकारण तसे पाहिले तर समाजासाठी असते हीच बाब विसरली जात आहे. निष्ठावंत शब्दच लोप पावत आहे. स्वस्वार्थासाठी पावले उचलली जात आहेत. आता कांही ठिकाणी युती व महायुती तर काही ठिकाणी एकेला चलो रे च्या बाब दिसून येत आहे. बऱ्याच ठिकाणी युती किंवा आघाडी झाली नाही. मतभेदामुळे स्वबळावर अनेकजन नशीब आजमावत आहेत. नगरपालिकाच्या निवडणुकीत बंडखोरी झाल्याचे दिसून येत आहे. त्याच प्रमाणे युती व आघाडी असताना सहयोगी पक्ष मदत करण्यात पुढे येत नाहीत. त्यामुळे जनतेच्यामनात काय चालले आहे हे ओळखणे आवघड होत असून अंदाज बांधणे आवघड होत आहे. आज जे पक्षांतर करीत आहेत त्यांच्यामागे कोण आहेत याचा विचार प्रवेश देणाऱ्यांनी केला पाहिजे. केवळ उमेदवारी दिली नाही किंवा मान-प्रतिष्ठा मिळत नसल्याच्या कारणाने जर पक्ष बदलले जात असेल तर जनतेत त्यांची प्रतिष्ठा किती आहे हे कळून येणार आहे. मुळात आपल्या राज्यात तीन पक्ष सत्तेत व तीन विरोधीपक्ष म्हणून समजले जातात. त्यामुळे तीघांत एकवाक्याता दिसून येत नाही. भिन्नता विचारात आहे. वागण्यात आहे हे लक्षात येते. मुळात आपल्याकडे निवडणुकीच्या काळात बरेच उलाढाली होतात. इतरवेळी शांतच असते. आज काही पक्षाचे वल्गला करीत आहे. आमच्या पक्षाची सत्ता येणार. आमच्या पक्षाचा महापौर किंवा नगराध्यक्ष होणार असे म्हणत आहेत. हे मुळात हास्यस्पद आहे. उदा. घ्यायचे झाले तर लातूरसारख्या शहरात कॉंग्रेस व भाजपा सोडलने तर इतर किती नगरसेवक निवडूण दरवेळा येतात. दोन-चार सेवक निवडूण येणाऱ्यापक्षाने आमच्या ताब्यात नगर किंवा महानगरपालिका येणार म्हणणे एक प्रकारचे हस्यास्पद आहे. नगरसेवक ही मोठी पदवी आहे. दररोजच संबंध नागरिकाशी येत असतो. मुळात काही नगरपरिषद आर्थिकदृष्ट्या संपन्न आहेत तर काहींची परिस्थिती नाजुक आहे. अशा नगरपरिषदेने आपली आर्थिक बाजू कशी मजबुत होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. आर्थिकता स्थैय निर्माण करू शकणारेच नगरसेवक निवडले जाणे अपेक्षित आहे. तसे पाहिले तरी नगरपंचायत व नगरपरिषदमध्ये निवडुण गेल्यास फार मोठी जनतेची कामे करावी लागतात असे नाही. दररोज नळास पाणी, स्वच्छता, विद्युतची व्यवस्था म्हणजे किमान गरजेची पुर्तता करणे आवश्यक आहे. काही झाले तरी राज्यातील काही नगरपंचायत व नगरपालिका ह्या आदर्श ठरलेल्या आहेत. त्यामुळे नगरसेवक निवडताना जनतेवर मोठी जबाबदारी आहे की, चांगले नगरसेवक निवडणे. यासाठी जागृत राहून नगरसेवक निवडण्याची जबाबदारी मतदराची आहे. जे पक्ष बदलणारे आहेत. त्यांच्यापाठीशी किती संख्यात्मक पाठबळ आहे याचा विचार केला पाहिजे. कोणालाही पक्षात प्रवेश देवुन पक्षाची प्रतिष्ठा कमी होईल असे कृत्य करू नये. सध्याला या पक्षात नको त्या पक्षात जाणे सुरू आहे. लोकशाहीत कोण कोठेही जाऊ शकतो याला बंधन नाही. जे पक्ष बदलतात ते एकनिष्ठ असतात का? याचा विचार पक्षात प्रवेश देताना केला पाहिजे. सध्याला भ्रष्ट असणाऱ्यांना प्रवेश देत राहीले तर पक्षाची बदनामी ठरलेली आहे. पक्षाचे कार्य पाहून जो पक्षप्रवेशानंतर समरस होऊ शकतो का? याचा विचार केला पाहिजे. ज्यांची पात्रता शंभर लोक मागे नाहीत अशांना प्रवेश देऊन काय साध्य होणार? एक फॅशन म्हणून चालले असेल तर ठिक! नसता काही उपयोग नसताना प्रवेश देणे टाळले पाहिजे. मुळात सध्याला आम्ही पुढारी आहोत अशा तोऱ्या वावरत आहेत. ज्यावेळी पक्षाने अधिकार दिले त्यावेळी लातूरचा काय कायपालट केला. वेगळा असा विकासाचा ठसा निर्माण केला नाही. तशी पाहिले तर राज्यात भाजपा व कॉंग्रेसला चांगले दिवस येण्याची शक्यता आहे. आता पर्यंत उदा. लातूर जिल्ह्यात कॉंग्रेस व भाजपा सोडली तर किती नगरसेवक निवडूण आणता आले आहेत. बोटावर मोजण्याइतके नगरसेवक निवडूण आल्याचे दिसून आले. तेही नंतर कोणाला पाठींबा देत होते हे जनतेला माहिती नाही असे नाही. राज्यात कॉंग्रेस किंवा भाजपाचे चालत असेल तर इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न करू नये असे नाही मात्र आपली प्रतिमा किती स्वच्छ आहे याचाही विचार मनात केला पाहिजे. जनता मतदान करताना अनेकदा विचार करते. पक्ष बदलू आहेत, त्यांना मदत करतेच असे नाही. त्यामुळे पक्ष बदलणारे नेत्यांनी विशेष विचार केला पाहिजे. पक्ष श्रेष्ठींने सुद्धा प्रवेश देताना विचार केला पाहिजे. आपण कोणाला प्रवेश देत आहोत. त्यांची सध्याची लोकप्रियतेची स्थिती काय आहे. याचा विचार केला जात नाही. मोठ्या शहरात भ्रष्टाचाऱ्यास पक्षात घेतल्याचे उदा. आहेत. सर्रास पक्ष प्रवेश दिला जात असेल तर विचार केला पाहिजे. सर्वात मोठी जबाबदारी आता मतदारावर आहे. कोणाला मत द्यायचे व नगरासाठी महत्वाचे कार्य करणारे कोण आहेत याचा विचार करून मते दिली पाहिजेत. पाच वर्षासाठी नगरसेवक म्हणून सेवा करण्याची संधी दिली जाणार आहे. एकदा निवडूण गेल्या चाडेचारवर्ष तोंड दाखऊ न शकणाऱ्यास मते देणार का? बऱ्याच वेळा एकदा निवडणुकीत विजय झाले की मतदाराकडे फिरकावयाचे नाही. त्यामुळे आता सर्वात मोठी जबाबदारी ही मतदाराची आहे. योग्य व प्रामाणिक सेवकांची निवड करणे अपेक्षित आहे.

# महात्मा फुले : सामाजिक क्रांतीचे शिल्पकार




भारतीय समाजाच्या इतिहासात १९व्या शतकाने एक मूलभूत परिवर्तनाची दिशा निश्चित केली आणि या परिवर्तनाच्या मध्यभागी महात्मा फुले हे व्यक्तिमत्त्व अग्रगण्य ठरले. जात, पंथ, लिंग आणि वर्ण यांच्या आधारे शतकानुशतके स्थिरावलेल्या असमानतेच्या प्रथांना त्यांनी विचारांच्या तलवारीने छेद दिला. त्यांचा दृष्टिकोन संघर्षाचा होता, परंतु तो संघर्ष द्वेषावर आधारित नव्हता; तो न्याय, विवेक आणि मानवतेवर आधारलेला होता. म्हणूनच जेथे वैर, शोषण, अन्याय आणि दमन होते तेथे त्यांनी समतेचे, शिक्षणाचे आणि स्वातंत्र्याचे विचार रुजविले. त्यांच्या समाजकार्याने भारतीय सामाजिक विचारसरणीला नवी दिशा दिली आणि भारतीय मानवमूल्यांच्या पुनर्रचनेसाठी ते एक प्रेरणादायी अध्याय ठरले. आज त्यांच्या स्मृतीदिनी त्यांचे कार्य समजणे म्हणजे फक्त इतिहास स्मरण करणे नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात न्याय, समानता आणि मानवी हक्कांच्या दिशेने पुढे जात राहण्याची शिकवण घेणे होय.

महात्मा फुले यांचे जीवन पाहताना जाणवते की ते फक्त विचारवंत नव्हते; ते समाजाचे निरीक्षक, त्याचे विश्लेषक आणि परिवर्तनासाठी एकत्रित कृतीचा मार्ग सुचवणारे होते. बालवयातच त्यांच्या मनाला स्पर्शलेली जातिभेदाची वेदना पुढे त्यांच्या संपूर्ण कार्याची प्रेरणा ठरली. शिक्षणाची संधी मिळूनही समाजाच्या एका वर्गावर केवळ जातनिहाय शिक्षणाचा हक्क नाकारला जात होता, हे वास्तव त्यांना खूप बोचले. म्हणूनच त्यांनी पहिली लढाई शिक्षणाच्या क्षेत्रातून सुरू केली. स्त्रियांचे शिक्षण आणि बहुजन समाजाच्या मुलांसाठी शैक्षणिक दार खुले करणे हे त्यांच्या संघर्षाचे पहिले पाऊल होते. सन १८४८ मध्ये पुण्यात त्यांनी आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली मुलींची पहिली शाळा हा भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा पहिला प्रकाशकिरण ठरला. शिक्षण ही फक्त माहिती मिळवण्याची पद्धत नसून विचार, स्वातंत्र्य आणि स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. स्त्रीला शिक्षण मिळाल्यास कुटुंब, समाज आणि पुढील पिढी सुशिक्षित होते, ही त्यांची दृष्टी आजही विकासाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आढळते.

त्यांच्या कार्यात सावित्रीबाई फ ुले यांचे स्थान अविभाज्य आहे. स्त्री शिक्षणात आणि सामाजिक आंदोलनात त्यांनी दिलेली साथ ही जगातील स्त्री मुक्ती चळवळींच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. सावित्रीबाईंच्या पाठीशी उभे राहून त्यांना मार्ग दाखवणे, समाजाच्या दगडफेक-अपमान आणि मानसिक आघातासमोर दृढ राहण्याची प्रेरणा देणे हे महात्मा फुले यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी स्त्रीला फक्त शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता तिला मानव म्हणून तिचे अधिकार दिले. त्याच काळात, जेव्हा स्त्रियांच्या माथ्यावर सतीप्रथा, बालविवाह, विधवांचे अमानुष जीवन आणि समाजाच्या कडेवर जगणे ही वास्तवता होती, तेव्हा फुले यांनी विवाहसंस्थेतील पुनर्रचनेची गरज मांडली. विधवांना पुन्हा विवाहाचे स्वातंत्र्य मिळावे आणि त्यांना समाजात सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी त्यांनी समाजसुधारणेची चळवळ उभी केली. विधवेस गर्भ असल्यास तिचे रक्षण व्हावे, समाजाने तिला आधार द्यावा, म्हणून त्यांनी 'बालहत्याप्रतिबंधक गृह' स्थापन केले. त्या काळात अशा विचारांची कल्पना करणे देखील समाजासाठी आघातक होते, परंतु फुले निर्धाराने या दिशेने उभे राहिले.

महात्मा फुले यांचा समाजदृष्टीत सत्यशोधक दृष्टीकोन सर्वात महत्त्वाचा आहे. त्यांनी समाजातील देव, धर्म आणि परंपरांना प्रश्न विचारला: ''हा धर्म मनुष्याला बांधून ठेवतो की मुक्त करतो?'' त्यांच्या मते धर्म हा समतेवर आधारित असावा, निसर्गनियमांशी सुसंगत असावा आणि प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून समान सन्मान मिळवून द्यावा, अन्यथा तो धर्म नसून अनीत्याची व्यवस्था असते. म्हणूनच त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने समाजातील जातीय असमानता, रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता यांना प्रत्युत्तर दिले. सत्यशोधक विवाहपद्धती समाजासाठी नवीन वळण ठरली. या विवाहात हुंडा, खर्चिक विधी किंवा ब्राह्मण पुरोहितांची आवश्यकता नव्हती. विवाहाचे आधारस्तंभ होते, त्यामध्ये समानता, संमती आणि मानवी मूल्ये, या विवाह व्यवस्थेने समाजातील शोषितांना पहिल्यांदा सन्मानाने विवाह करण्याचा अधिकार दिला.

शेतकरीवर्ग, कृषीव्यवस्था आणि सामाजिक-आर्थिक विषमता यांवर फुले यांनी केलेले चिंतन आजही आधुनिक समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमाचा आधार आहे. कृषीव्यवस्था, जमीनदारी, करप्रणाली आणि दलालपद्धती यांमधील विषमता त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकाद्वारे स्पष्ट केली. शेतकरी हा अन्नदाता असूनही तो गुलामासारखे जीवन जगतो, हे त्यांनी निर्भीडपणे प्रतिपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी आणि बहुजन समाजाला आपण गुलाम का आहोत याचे भान निर्माण करणे हा त्यांचा केंद्रबिंदू होता. यामुळे समाजस्वातंत्र्य आणि आत्मभानाची प्रक्रिया सुरू झाली. त्यांनी सांगितले की ''मनुष्याने मनुष्याला गुलाम मानणे ही पापाची पराकाष्ठा आहे आणि या पापातून मुक्त होण्यासाठी शिक्षण आणि संघटन हा मार्ग आहे.''

भारतीय स्त्री-पुरुष, जात-पात, धार्मिक असमानता आणि आर्थिक शोषण यांच्या विरोधात फुल्यांनी केलेल्या संघर्षाचा विस्तार फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. त्यांची विचारधारा पुढे भारतातील सामाजिक न्याय, आरक्षण, स्त्री समता, धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि मानवाधिकारांच्या पाया ठरली. त्यांचे कार्य भारतातील दलित-बहुजन चळवळींचे आद्यस्रोत ठरले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, पेरियार रामासामी यांसारख्या महान कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान त्यांच्याच कार्यातून उगम पावले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आधुनिक भारतातील महान सामाजिक अभियंता मानले.

महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजाला केवळ विरोध दिला नाही, तर पर्यायी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की समाजातील बदल विचारांपासून सुरू होऊन कृतीत उतरला पाहिजे. म्हणूनच त्यांचे प्रत्येक आंदोलन, प्रत्येक भाषण आणि प्रत्येक उपक्रम प्रत्यक्ष समाजपरिवर्तनाशी जोडलेला होता. त्यांच्या 'तृतीय रत्न', 'गुलामगिरी', 'सत्यशोधक समाज' आणि इतर लेखनात त्यांनी समतेचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. ''जोपर्यंत समाजात समानता नसते, तोपर्यंत स्वातंत्र्य निरर्थक आहे'' हा त्यांचा मूलभूत संदेश आजही भारतीय संविधानाच्या आत्म्याशी जोडलेला आहे.

त्यांच्या जीवनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कोणालाही शत्रू मानले नाही; त्यांनी फक्त अन्याय, अज्ञान आणि जातीय नियंत्रण करणाऱ्या विचारांना शत्रू मानले. बुद्धी, विज्ञान आणि विवेकावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न होते. ते म्हणाले होते की ''शिक्षणाशिवाय मनुष्य गुलाम बनतो आणि शिक्षणानेच मनुष्य स्वातंत्र्य मिळवतो.'' म्हणूनच त्यांनी शिक्षक म्हणून काम केले, मार्गदर्शक म्हणून प्रेरणा दिली आणि समाजकार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. समाजाने नाकारले, हसले केले, विरोध केला; पण त्यांनी थांबणे, निराश होणे किंवा मागे हटणे हे कधी शिकले नाही.

आज महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहताना जाणवते की भारतीय समाजात आजही त्यांचे विचार अत्यंत आवश्यक आहेत. आजही स्त्री शिक्षणाची असमानता, जातीय भेद, आर्थिक असमानता, अंधश्रद्धा आणि सांस्कृतिक विषमता पुन्हा डोके वर काढताना दिसतात. म्हणूनच फुले यांचे कार्य आजचा मार्गदर्शक दीप आहे. समता, शिक्षण, स्वातंत्र्य, मानवी मूल्ये आणि सामाजिक न्याय ही त्यांची देणगी आहे. त्यांची कार्यप्रणाली व्यक्ती, समाज आणि शासन या तिन्ही स्तरांना प्रेरणा देते. त्यांचा संघर्ष आजच्या प्रगत भारतासाठी एक शक्तीगंध घेऊन उभा आहे.

महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनी त्यांना अभिवादन करणे म्हणजे केवळ शब्दांचे गौरव नव्हे, तर त्यांच्या विचारांचे पुनर्स्थापन करण्याची गरज ओळखणे आणि त्या दिशेने पाऊल उचलणे होय. समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि उपेक्षित वर्गासाठी त्यांनी पेटवलेला विचारप्रकाश आजही जिवंत आहे. त्यांच्या विचारातून अनेक पिढ्यांना मार्ग मिळतो, ऊर्जेचा स्रोत मिळतो आणि नवीन सामाजिक बदलांची बीजे तयार होतात. म्हणूनच महात्मा फुले हे केवळ व्यक्तिमत्त्व नसून समाजक्रांतीचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन हे संदेश देते की न्याय आणि मानवता जिंकते, अन्याय आणि विषमता कोसळते. ज्या ठिकाणी मनुष्याला मनुष्यत्वाची जाणीव होते तेथे महात्मा फुले यांच्या विचारांचा स्पर्श असतो.

आज आपण त्यांच्या कार्याचा विचार करतो तेव्हा समाजातील प्रत्येक क्षेत्रातून, शिक्षण, महिलांचे हक्क, धर्म, राजकारण, कृषि आणि सामाजिक न्याय त्यांचा प्रभाव दिसतो. ते सामाजिक क्रांतीचे शिल्पकार होते, मानवी मूल्यांचे संवाहक होते आणि आधुनिक भारतातील समतेच्या आंदोलनांचे अग्रदूत होते. म्हणून त्यांचे स्मरण ही केवळ एक दिनांकाची औपचारिकता नाही; तर ती एक चेतना आहे. आणि त्या चेतनेतूनच निर्माण होईल तो विचार म्हणजेच ''मानवतेच्या आधारे उभा असलेला नवा समाज होय.''

महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत**
**मो. ९९६०१०३५८२,**

# मुक्त विद्यापीठ कृषी शिक्षणक्रम पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज भरण्याची मुदत ०१ ते १५ डिसेंबर




**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कृषी शिक्षणक्रमाच्या प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमाच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची अंतिम प्रात्यक्षिक परीक्षा ही येत्या फेब्रुवारी २०२६ मध्ये तर अंतिम लेखी परीक्षा मे/जून २०२६ मध्ये होणार आहे. त्यासाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्याची मुदत येत्या सोमवार दिनांक ०१ ते १५ डिसेंबर २०२५ पर्यंत राहील. तसेच विलंब शुल्कासह दिनांक १६ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२५ व विशेष विलंब शुल्कासह दिनांक २२ ते २६ डिसेंबर २०२५ पर्यंत हा अर्ज भरता येईल.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने यासंदर्भात सुचनापत्रक जारी केले आहे. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी संपलेला आहे, अशा कृषी प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमाच्या (कृषी पदवी वगळता) विद्यार्थ्यांनी प्रथम विहित पध्दतीने पुनर्नोंदणी करणे अनिवार्य आहे. पुनर्नोंदणीसाठी ०२५३ २२३०१०६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावयाचा आहे. पुनर्नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच पुनर्परीक्षा अर्ज भरता येईल. विद्यार्थ्यांनी केवळ ऑनलाईन पद्धतीनेच परीक्षा अर्ज व शुल्क भरायचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन पद्धतीने न भरलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज भरण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला (http://ycmou.digitaluniversity.ac) भेट देऊन 'Online Exam Form Submission for Repeater Student' वर क्लिक करावे. त्यानंतर विद्यार्थ्याने आपला १६ अंकी नोंदणी क्रमांक (पीआरएन -PRN) नोंदवून अर्ज भरावा.

तसेच, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सर्व विद्यार्थ्यांना एबीसी आयडी (अकॅडमिक बँक ऑफ क्रेडीट) तयार करणे देखील अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांनी तो सादर केलेला नाही, त्यांचा अंतिम निकाल जाहीर केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांनी परीक्षेसंबंधी सर्व अद्ययावत माहिती व वेळापत्रकासाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ वेळोवेळी पहावे असे आवाहन परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

## व्हॉट्सअ‍ॅपवरून बुक करा उबर राइड, ताबडतोब नोंद करुन ठेवा हा नंबर




बऱ्याच वेळा स्टोरेजमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे मोबाईलमध्ये जास्त ॲप्स ठेवता येत नाहीत. अशा परिस्थितीत, जेव्हा तुम्हाला कॅब बुक करायची असते, तेव्हा तुम्हाला प्रत्येक वेळी ॲप्लिकेशन डाउनलोड करावे लागते. पण हे पुन्हा पुन्हा केल्याने कधीतरी चिडचिड होते. म्हणून, आम्ही तुम्हाला एक पद्धत सांगू ज्यानंतर तुम्हाला तुमच्या फोनमध्ये कॅब सेवेसाठी ॲप ठेवण्याची आवश्यकता भासणार नाही. तुम्ही फक्त तुमच्या व्हॉट्सॲपवरूनच कॅब बुक करू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या फोनवरून फक्त एक मेसेज पाठवायचा आहे. पण तुम्ही हे कसे कराल हे जाणून घेण्यासाठी, खालील संपूर्ण प्रक्रिया वाचा.

व्हॉट्सॲपद्वारे बुक करा उबर कॅब

आता तुम्ही विचार करत असाल की तुम्ही व्हॉट्सॲपद्वारे उबेर कसे बुक करू शकता. यासाठी एक ॲप आवश्यक आहे. पण वर सांगितल्याप्रमाणे, तुम्ही व्हॉट्सॲपद्वारे कुठेही जाण्यासाठी कॅब बुक करू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या स्मार्टफोनमध्ये ७२९२०००००२ हा नंबर सेव्ह करावा लागेल.

यानंतर तुमचे काम होईल. नंबर सेव्ह केल्यानंतर तुमच्या फोनमध्ये व्हॉट्सॲप ओपन करा. यानंतर चॅट विभागात जा आणि हाय असा संदेश पाठवा.

यानंतर तुमची भाषा निवडा, भाषा निवडल्यानंतर तुम्हाला तुमचे स्थान प्रविष्ट करावे लागेल. पिकअप ठिकाण निवडल्यानंतर, तुमची कॅब बुक केली जाईल.

तुम्हाला ड्रायव्हरचा तपशील मिळेल आणि शेअर पिन देखील येईल. हे ड्रायव्हरला सांगून तुम्ही तुमची राइड घेऊ शकता.

**लॉग इन करूनही करु शकता राइड बुक**

तुमच्या हाय मेसेजनंतर भाषा निवडण्याचा पर्याय दिसत नसल्यास, काळजी करू नका. वेगवेगळ्या फोनमध्ये हा पर्याय वेगळा असू शकतो. तुम्हाला त्दुग्ह चा पर्याय मिळेल, त्यानंतर त्दुग्ह वर क्लिक करा. यानंतर तुमच्या नोंदणीकृत क्रमांकावर ध्ऊझ येईल. ध्ऊझ टाकल्यानंतर पासवर्ड टाका, त्यानंतरच तुम्ही तुमची कॅब बुक करू शकाल.

## असे अन्न खाल्ल्याने होऊ शकतो स्मृतिभ्रंश, असे दिसून आले आहे संशोधनात

अलीकडेच अमेरिकेत अल्झायमर आजाराबाबत एक संशोधन सादर करण्यात आले. या संशोधनात १ लाखांहून अधिक लोकांचा समावेश करण्यात आला होता. अल्ट्रा प्रोसेस्ड फूडच्या दुष्परिणामांचे २ दशक चाललेल्या संशोधनात वर्णन केले आहे. संशोधनात असे दिसून आले आहे की अल्ट्रा प्रोसेस्ड फूड खाल्ल्याने स्मृतिभ्रंश होऊ शकतो. विस्मरणाला वैद्यकीय भाषेत डिमेंशिया आणि अल्झायमर म्हणतात. डिमेंशियामध्ये व्यक्तीची स्मरणशक्ती कमकुवत होऊ लागते. अमेरिकन अल्झायमर असोसिएशनने केलेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की लोक जितके जास्त प्रक्रिया केलेले अन्न खातात, तितका स्मृतिभ्रंश होण्याचा धोका जास्त असतो.

संशोधनानुसार, प्रक्रिया केलेले मांस खाल्ल्यानेही डिमेंशियाचा धोका वाढतो. जे आठवड्यातून दोनदा किंवा महिन्यातून दोनदा ते खातात त्यांच्या तुलनेत स्मृतिभ्रंशाचा धोका सुमारे १० टक्के जास्त असतो. त्याचप्रमाणे, कोणत्याही प्रकारचे प्रक्रिया केलेले अन्न खाणाऱ्यांमध्ये स्मृतिभ्रंशाचा धोका असे अन्न न खाणाऱ्यांपेक्षा १२ टक्के जास्त असतो. हा धोका केवळ वृद्धांमध्येच असेल असे नाही. खराब अन्नामुळे कोणत्याही वयात हा आजार होण्याचा धोका वाढतो.

स्मृतिभ्रंश हा एक आजार आहे, जो व्यक्तीच्या स्मरणशक्तीवर, विचारसरणीवर आणि सामाजिक क्षमतेवर परिणाम करतो. स्मृतीभ्रंशामुळे ग्रस्त असलेले लोक त्यांच्या दैनंदिन क्रियाकलापांना विसरायला लागतात. हे बऱ्याचदा या स्थितीच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक आहे. पण तुम्हाला विसरण्याची समस्या आहे, याचा अर्थ तुम्हाला स्मृतिभ्रंश आहे असे नाही. जेव्हा तुम्ही महत्त्वाची दैनंदिन कामे विसरण्यास सुरुवात करता, तेव्हा स्मृतिभ्रंश होतो. बहुतेक प्रकरणांमध्ये, अल्झायमर रोगामुळे स्मृतिभ्रंश होतो. हा रोग बहुतेकदा वृद्ध लोकांमध्ये होतो. धूम्रपान, खराब आहार, नैराश्य आणि डोक्याला कोणतीही गंभीर दुखापत, हे या आजारासाठी धोक्याचे घटक आहेत.

**काय आहेत डिमेंशियाची लक्षणे**

विसरण्याची समस्या
काहीही नियोजन न करू शकणे
शब्द बोलण्यात अडचण
काही काम महत्त्वाचे असेल, तर तेही विसरून जाणे
संभ्रमात असणे
काहीही नियोजन करू न शकणे

कसा करायचा बचाव

तुमचे मन सक्रिय ठेवा
नशा करु नका
व्हिटॅमिन डी घ्या
दररोज व्यायाम करा
आपल्या आहाराची काळजी घ्या



# हिवाळ्यात त्वचा चमकदार टवटवीत ठेवण्या करिता हे करा

हिवाळा जवळ येताच, थंड वारे आणि कमी आर्द्रता त्वचा कोरडी, खडबडीत आणि निर्जीव बनवू शकते. हिवाळ्यात त्वचा तिची नैसर्गिक ओलावा गमावते, ज्यामुळे कोरडे ठिपके, खाज सुटणे, लालसरपणा आणि निस्तेज त्वचा यासारख्या समस्या उद्भवतात. म्हणूनच, हिवाळ्याच्या महिन्यांत तुमच्या त्वचेची अतिरिक्त काळजी घेणे महत्वाचे आहे.

-ड्डज ठए-ऊ वारानुसार दररोज फेस पॅक लावा आणि जादुई चमक मिळवा

योग्य दिनचर्या आणि काही सोप्या सवयींसह,संपूर्ण हंगामात मऊ, निरोगी आणि चमकदार त्वचा राखू शकता. या उपायांवर नजर टाकू या. सौम्य हायड्रेटिंग क्लीन्सर वापरा

बहुतेक नियमित साबण आणि फेसवॉश तुमच्या त्वचेतील नैसर्गिक तेल काढून टाकतात, ज्यामुळे ती आणखी कोरडी होते. हिवाळ्यात, सौम्य, हायड्रेटिंग क्लीन्सर निवडा जो ओलावा न काढता स्वच्छ करतो. कोरफड, ग्लिसरीन, ओट अर्क आणि सिरॅमाइड्स असलेले असे क्लीन्सर निवडा. हे घटक क्लीन्सिंग करताना ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात.

आंघोळीनंतर लगेच मॉइश्चरायझर लावा

हिवाळ्यातील त्वचेची काळजी घेण्याचा सर्वात महत्त्वाचा नियम म्हणजे आंघोळीनंतर तीन मिनिटांच्या आत मॉइश्चरायझर लावणे. यामुळे ओलावा टिकून राहण्यास मदत होते. शिया बटर, कोको बटर, बदाम तेल किंवा हायलुरोनिक ॲसिड असलेले जाड, क्रिमी मॉइश्चरायझर निवडा. ज्यांची त्वचा खूप कोरडी आहे ते आंघोळीपूर्वी किंवा नंतर नारळ, ऑलिव्ह किंवा मोहरीच्या तेलाने मसाज करू शकतात.

हिवाळ्यात गरम पाण्याने आंघोळ करण्याचा मोह होतो, परंतु जास्त गरम पाण्यामुळे त्वचेतील नैसर्गिक तेल निघून जाते, ज्यामुळे ती डिहायड्रेट होते. त्याऐवजी, आंघोळ करण्यासाठी आणि चेहरा धुण्यासाठी कोमट पाणी वापरा. तुमचा आंघोळीचा वेळ १० मिनिटांपर्यंत मर्यादित करा. यामुळे जास्त कोरडेपणा आणि जळजळ टाळता येते.

साठीतही चेहऱ्यावर पंचविशीतली लकाकी कशी टिकवाल? या चीनी पद्धतीचे रहस्य



दररोज सनस्क्रीन वापरा

हिवाळ्यात बरेच लोक सनस्क्रीन वापरणे टाळतात, परंतु सूर्यप्रकाश नसतानाही अतिनील किरणे सक्रिय असतात. सूर्यप्रकाशामुळे कोरडेपणा, सुरकुत्या आणि रंगद्रव्य येऊ शकते. ३० किंवा त्याहून अधिक एसपीएफ असलेले सनस्क्रीन वापरा आणि दररोज सकाळी लावा. जर बाहेर असाल तर दर चार तासांनी पुन्हा लावा.

नैसर्गिक घरगुती उपचार वापरून पहा

मऊ आणि चमकदार त्वचेसाठी तुम्ही साधे घरगुती घटक वापरू शकता.

मधाचा मास्क: तुमच्या चेहऱ्यावर मधाचा पातळ थर १० मिनिटे लावा. ते खोलवर मॉइश्चरायझ करते आणि कोरडेपणा कमी करते.

दूध + हळद: दुधात चिमूटभर हळद मिसळा आणि चेहऱ्याला लावा. यामुळे तुमचा रंग सुधारतो आणि निस्तेजपणा कमी होतो.

कोरफड जेल: तुमच्या त्वचेला मॉइश्चरायझ करण्यासाठी आणि दुरुस्त करण्यासाठी ताजे कोरफड लावा.

-ड्डज ठए-ऊ आयुर्वेदात लपलेले आहे सुंदर त्वचेचे रहस्य, या घरगुती उपायाने चमकदार त्वचा मिळवा-जास्त एक्सफोलिएशन टाळा

एक्सफोलिएशनमुळे मृत त्वचेच्या पेशी काढून टाकण्यास मदत होते, परंतु जास्त एक्सफोलिएशनमुळे त्वचेचा थर खराब होऊ शकतो आणि जळजळ होऊ शकते, विशेषतः हिवाळ्यात. आठवड्यातून फक्त एकदाच सौम्य स्क्रबने एक्सफोलिएट करा.

# हिवाळ्यात खरोखरच तुम्हाला उबदार ठेवते का?



हा एक खूप सामान्य प्रश्न आहे! हिवाळ्यात रम (किंवा इतर अल्कोहोल) प्यायल्याने तुम्हाला उबदारपणाची भावना नक्कीच येते, पण वास्तविकतेत ते तुमच्या शरीराला थंड करू शकते. हिवाळ्यात शरीर उबदार ठेवण्यासाठी, बरेच लोक कॅफिन (चहा आणि कॉफी) व्यतिरिक्त अल्कोहोलचा अवलंब करतात. रम किंवा ब्रँडी कमी प्रमाणात पिल्याने शरीर उबदार राहते आणि सर्दी आणि खोकला टाळता येतो असा एक सामान्य समज आहे. काही जण हिवाळ्यात मुलांना ब्रँडी देण्याची शिफारस करतात. कधीकधी, लोक खोकला किंवा सर्दी दरम्यान थोड्या प्रमाणात रम घेण्याचा सल्ला देखील देतात. पण हिवाळ्यात थोड्या प्रमाणात रम पिल्याने खरोखरच शरीर उबदार आणि निरोगी राहण्यास मदत होते का? तज्ञ आणि वैद्यकीय विज्ञान काय म्हणतात ते जाणून घ्या-

तात्पुरता उबदारपणा विरुद्ध वास्तविक तापमान- जेव्हा तुम्ही रम (किंवा कोणतेही अल्कोहोल) पिता, तेव्हा तुमच्या त्वचेजवळच्या रक्तवाहिन्या रुंद होतात (याला वासोडिलेशन म्हणतात). यामुळे शरीरातील गरम रक्त त्वचेच्या पृष्ठभागाकडे अधिक वेगाने वाहू लागते. परिणामी तुमच्या त्वचेला तात्पुरती उबदारपणाची आणि लालीची भावना येते.

गाभा तापमान कमी होते- ही उबदारपणाची भावना खरी नसते. तुमच्या त्वचेकडे रक्त वाहिल्यामुळे, तुमच्या शरीरातील महत्त्वाच्या अवयवांचे (तळींरश्र जीसरपी) गाभा तापमान (ऊेश इेवू ढशा-शिीरींीश) खरं तर कमी होऊ लागतं, कारण उष्णता वातावरणात लवकर नष्ट होते.धोका वाढतो- थंडीच्या परिस्थितीत, गाभा तापमान कमी होणे धोकादायक ठरू शकते आणि यामुळे हायपोथर्मिया चा धोका वाढतो. इतर धोके- अल्कोहोलमुळे तुमच्या मेंदूवर परिणाम होतो आणि तुम्हाला किती थंडी लागत आहे, याची जाणीव कमी होते. यामुळे तुम्ही जॅकेट काढण्याचा किंवा थंडीत जास्त वेळ बाहेर थांबण्याचा धोका पत्करू शकता, ज्यामुळे शरीराचे तापमान अजून वेगाने कमी होते.थरथरणे कमी होते- थंडीत शरीर नैसर्गिकरित्या उष्णता निर्माण करण्यासाठी थरथरणे सुरू करते. अल्कोहोल या नैसर्गिक प्रतिसादात अडथळा आणू शकते, ज्यामुळे शरीराचे तापमान वाढवण्याची प्रक्रिया मंदावते. त्यामुळे, डॉक्टर्स आणि वैद्यकीय तज्ञांच्या मते, थंडीत अल्कोहोल, जसे की रम, खरोखर उबदार ठेवत नाही; ते फक्त उबदारपणाची खोटी भावना देते. अति थंडीत सुरक्षित राहण्यासाठी, गरम, नॉन-अल्कोहोलिक पेय प्या आणि पुरेसे उबदार कपडे घाला.

# शांततेचा व्यवसाय करणारे हेच ते...?

ट्रम्प यांच्यामुळे युक्रेनसमोर तिढा निर्माण झाला आहे. 'स्वतःची प्रतिष्ठा गमावणे किंवा अमेरिका गमावण्याची जोखीम पत्करणे' हेच पर्याय आहेत, हे झेलेन्स्की यांचे शब्द बरेच काही सांगून जातात. आपल्या अस्थिर मानसिकतेचा आणि अविश्वासार्ह व्यक्तिमत्वाचा प्रत्यय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा जगाला दिला. यावेळचे निमित्त आहे, रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाला पूर्णविराम देण्यासाठी त्यांनी तयार केलेला प्रस्ताव. ट्रम्प यांनी तो जाहीर केला, या एकमेव आधारावर तो त्यांचा म्हणता येईल; प्रत्यक्षात हा प्रस्ताव रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी सुचविला असावा, असेच त्याचे स्वरूप आहे! स्वतःला युक्रेनचा मित्र म्हणविणार्या अमेरिकेने आणि ट्रम्प यांनी 'शांतता करारा'च्या नावाखाली युक्रेनला सपशेल शरणागती पत्करण्यास सांगितले आहे. युद्धबंदी प्रस्तावातील बहुतेक सर्व तरतुदी रशियाच्या बाजूने आहेत. अर्थात, रशियाला अनुकूल असलेला करार होणे भारतासाठी हिताचेच; पण प्रश्न तो नाही. ट्रम्प हे जगासाठी, अमेरिकेला मित्र देश मानणार्यांसाठी किती धोकादायक आहेत, हे पुन्हा दिसले. युक्रेन आणि रशियाचे युद्ध दीर्घकाळ सुरु आहे. अमेरिकेचा विस्तारवाद, हे युद्धाचे कारण. अमेरिकाप्रणित 'नाटो' संघटनेमध्ये युक्रेनचा समावेश करून रशियाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचणे, हे उद्दिष्ट ठेवून अमेरिका आणि अमेरिकेची हुजरेगिरी करणारे युरोपीय देश युक्रेनच्या मागे उभे राहिले. अन्यथा, रशियासारख्या महासत्तेशी युक्रेनसारखा देश चार वर्षे झुंजतो, हे केवळ अशक्य होते.



२८ कलमी शांतता प्रस्ताव

बहुध्रुवीय जगाचे समीकरण अमेरिकेला मानवणारे नाही. आपणच एकमेव महासत्ता, या महत्त्वाकांक्षेतून रशियाला जेवढे कमकुवत करता येईल तेवढे करण्यासाठी अमेरिकेने एकही पर्याय सोडला नाही. दूरदृष्टी नसलेले युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्या रुपाने आपली उद्दिष्टे साध्य करून देणारी व्यक्ती अमेरिकेला मिळाली! अमेरिकेसह युरोपीय देशांची युक्रेनला सक्रिय मदत असताना देखील रशियाने आपली ताकद दाखवून दिली. रशियाला नमवता येणार नाही, हे अमेरिकेला कळून चुकले आहे. युद्धासाठी स्वतः चिथावणी द्यायची, शस्त्रास्त्रांसह आर्थिक मदत करायची आणि निर्बंधाच्या धमक्या रशियाला! अर्थात, बरीच वर्षे त्या धमक्या प्रत्यक्षात आणण्याची अमेरिकेची हिंमत नव्हती. थेट रशियावर कारवाई करता येत नाही, हे स्पष्ट झाल्यावर रशियाचे मित्रदेश कसे अडचणीत येतील, यासाठी ट्रम्प यांनी पावले टाकली. भारतावर लादलेले आयातशुल्क त्याचाच भाग. भारताने रशियाकडून इंधन खरेदी करायचे नाही, आम्ही मात्र युरेनियम खरेदी सुरु ठेवू, हे त्यांचे दुट्टपी धोरण. रशियावरील निर्बंधाअंतर्गत गोठविलेल्या रकमेपैकी १०० अब्ज डॉलर युक्रेनच्या फेरउभारणीसाठी वापरण्याची शांतता प्रस्तावातील तरतूद, हेच ट्रम्प यांनी युक्रेन आणि झेलेन्स्की यांची साथ सोडण्याचे कारण आहे. फेरउभारणीच्या कंत्राटाचे माप त्यांच्याच पदरात पडणार आहे. शांतता प्रस्ताव हा बुरखा, 'व्यावसायिक' भाग महत्त्वाचा. अर्थातच, १०० अब्जाचा हा सौदा रशियासाठी महाग नाही. ट्रम्प यांचे निर्णय कसे होतात, याची ही झलक. अध्यक्ष असताना तुम्ही व्यवसाय कसा करू शकता? असा थेट प्रश्न त्यांना अलीकडेच विचारला गेला; पण त्यांची कातडी निबर आहे. युक्रेनला 'नाटो'चे सदस्यत्व दिले जाणार नाही, रशियाने जिंकलेले क्रिमिया, डोनत्सेक, लुहात्सक, खेरसान असे भाग रशियाकडेच राहतील. युक्रेन सीमेवरील सुमी आणि खारकिव्ह हे भाग देखील रशियाच्या ताब्यात राहतील, युक्रेनला सैन्य कपात करावी लागेल, सैन्यासाठी नऊ लाखांऐवजी सहा लाख ही मर्यादा राहील, नाटोकडून सीमांचा विस्तार केला जाणार नाही, युक्रेन युद्धासाठी रशियाला जबाबदार ठरविले जाणार नाही, असे २८ कलमी शांतता प्रस्तावात ट्रम्प यांनी नमूद केले आहे. सार्वभौमत्व कायम ठेवण्याची 'उदार' हमी युक्रेनला देण्यास ते विसरले नाहीत. 'झेलेन्स्की यांना हा प्रस्ताव आवडून घ्यावाच लागेल, न आवडल्यास त्यांना फक्त लढत राहावे लागेल', ही ट्रम्प यांची भाषा. यामुळे युरोपीय देश धास्तावले. शांतता कराराची घाई नको, असा इशारा जर्मनीचे परराष्ट्र मंत्री जोहान वडेफुल यांनी दिला आहे. 'युक्रेनशिवाय युक्रेनबद्दल काहीही नाही', असे युरोपीय संघाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी म्हटले आहे. मात्र; ट्रम्प यांची भूमिका पाहता युक्रेनआधी युरोपलाच माघार घ्यावी लागणार आहे.

## डॉक्टर टीप्स

### रात्री उशिरा झोपणार्या पुरुषांना नपुंसक होण्याचा धोका



बदलत्या लाईफस्टाईलमुळे चुकीचा आहारामुळे मधुमेही रूग्णांमध्ये वाढ होताना दिसतेय. यामुळे मधुमेही रूग्णांना त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयीवर विशेष लक्ष द्यावं लागतं. मधुमेही रूग्णांच्या मनात खाण्या-पिण्याच्या सवयीबाबत अनेक प्रश्न असतात. यामधील एक प्रश्न म्हणजे मधुमेही रूग्णांनी पीनट बटर खावा का? मधुमेही रूग्ण खाऊ शकतात का अनेक रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला आहे की, मधुमेही रूग्ण पीनट बटर खाऊ शकतात.

पीनट बटरच्या सेवनाने कोणतंही नुकसान होत नाही. मात्र Peanut Butter खाताना तुम्हाला ते प्रमाणात खाल्लं पाहिजे.

## विनोद




राहुल : 'तू लहानपणी रंगवलेलं एखादं स्वप्न खरं झालंय का रे?'

सचिन : 'एकच, लहानपणी माझी आई जेव्हा माझा भांग पाडायची तेव्हा मला नेहमी वाटायचं मला केसच नसते तर...'

## संदेश

Bank mein 1 bhi rupaya jama nahin kiya.

Phir bhi Income Tax Department se notice aaya,

Likha tha,"Kuchh to Kama Besharm"!

## सुविचार



एकमेकांनी एकमेकांना सुखाने जगू देणे हेच भगवंताचे भजन आहे, देवाचे पूजन आहे, तोच खरा धर्म आहे. धर्माचा उपयोग आत्मिक शांती आणि समाजाची दु:खे निवारण्यासाठी असतो. माणसाकरिता धर्म आहे, धर्माकरिता माणूस नाही.

**- संत तुकडोजी**

**संस्कृत सुभाषित**

कारे नाठविशी कृपाळू देवासी ।
पोशितो जगासी एकलाचि।।

**अर्थ :** संकुचित बुद्धी व स्वार्थ माणसाला खरे देत नाही. उदार मन आणि त्या दुसऱ्यासाठी काही करणे, झिजणे हाच आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. दया
३. मांडी
५. अदबीने
१०. वस्तू, जिन्नस
११. काथ्यकूट, तीच-ती चर्चा
१२. तात्पर्य
१३. थापा मारणारा
१५. सुवर्ण
१७. दुधाचे पक्वान्न
१९. सूर्यमालेचा घटक
२०. एक ज्वालाग्राही पदार्थ
२१. भाताचा एक चवदार प्रकार
२२. पुरेसे, पुष्कळ
२४. सर्व
२६. कुटील बेत, कारस्थान
२७. भ्रम, जादू
२८. घर
२९. पश्चात्ताप
३२. परतंत्र
३३. आकर्षण, लोभ
३४. जमीन
३५. ढग
३७. विष
४०. आई
४१. सूर्य
४२. चांगले नशीब
४३. जाणुनबुजून, हेतूत:
४५. पवित्र
४७. देवदासची प्रेयसी
४८. अभिनेता
४९. भय
५१. नशीब
५२. पती
५४. अधीन
५५. सगळ्यात महाग रत्न
५६. औषधी मात्रा उगाळण्याचा दगड
५७. सरबताचे आंबट फळ
५९. गाढव आणि ससा
६१. जास्त वजनाचे
६३. मोठ्या आकराचे
६५. जोखड
६६. मासा
६८. श्रीमंत
७०. उद्यान
७२. कावळा
७३. थोर
७५. वृक्ष
७६. पुष्कळ
७७. पोट
७८. अशक्य, टोकाचा
७९. राजाची आई
८१. केसांचा कृत्रिम रंग
८२. राजाची गाडी
८३. जंगल
८४. कसोटी

## उभे शब्द

१. गोंगट
२. धाक
३. स्वीकार
४. सोन्याचे शुद्धतेचे प्रमाण
५. अजून
६. पृथ्वी
७. पुराचा फटका बसलेले
८. गोष्ट
९. वेळ दाखवणारे यंत्र
१४. अंत, मर्यादा
१६. नवीन
१८. कुमक
२२. भिववणारे
२३. सेतू
२५. आर्जवे, अजीजी
२६. वस्त्र
२७. चोप
२८. निर्हेतुक, लीलया
३०. प्रखरता, तीष्णता
३१. चमत्कारिक
३२. पावलांचा आवाज
३६. मातीचे पात्र बनवणारा
३८. सहस्रावधी
३९. पुच्छ
४०. शेवटचा मणका
४४. सिंह
४५. शंकराचे प्रतीक
४६. एखाद्या भरवशावर राहणे
४७. बंध
५०. युद्धभूमी
५३. उसाचा काकवीपेक्षा दाट रस
५४. रंग
५५. डासामुळे होणारा आजार
५८. तळ, खालचा भाग
६०. काव्य
६२. बारा
६३. टोक
६४. बांधून ठेवणारी गोष्ट
६७. बकरा
६९. अवास्तव, खूप जास्त
७०. परका, बाहेरून आलेला
७१. ---- महावीर-जैनांचे तीर्थंकर
७२. कथेपेक्षा दीर्घ वाड्मय प्रकार
७३. सहाय्य
७४. पराभव
७५. मनातील भावना, मनोव्यापार
७८. स्वाभाविक आवड, प्रवृत्ती
८०. किंचित

## आडवे उत्तर

१.कणव ३.पट ५.आदरपूर्वक १०.माल ११.चर्वित-चर्वण १२.सार १३.थापाड्या १५.कनक १७.खीर १९.ग्रह २०.राळ २१.पुलाव २२.भरपूर २४.समस्त २६.कावा २७.माया २८.सदन २९.उपरती ३२.परवश ३३.मोह ३४.धरा ३५.जलद ३७.जहर ४०.माता ४१.रवी ४२.सौभाग्य ४३.जाणीवपूर्वक ४५.शिव ४७.पारो ४८.नट ४९.डर ५१.दैव ५२.नवरा ५४.वश ५५.हिरा ५६.सहाण ५७.लिंबू ५९.लंबकर्ण ६१.अवजड ६३.अगडबंब ६५.जू ६६.झक ६८.धनवान ७०.उपवन ७२.काक ७३.महान ७५.विटप ७६.उदंड ७७.उदर ७८.कमालीचा ७९.राजमाता ८१.कलप ८२.रथ ८३.रान ८४.परीक्षा

## उभे उत्तर

१.कलकलाट २.वचक ३.पतकर ४.टच ५.आणखी ६.रसा ७.पूरग्रस्त ८.कथा ९.घड्याळ १४.पारावार १६.नव १८.रसद २२.भयावह २३.पूल २५.मनधरणी २६.कापड २७.मार २८.सहज ३०.तीव्रता ३१.अजब ३२.पदरव ३६.कुंभार ३८.हजारो ३९.शेपूट ४०.माकडहाड ४४.वनराज ४५.शिवलिंग ४६.अवलंबन ४७.पाश ५०.रण ५३.राब ५४.वर्ण ५५.हिवताप ५८.बूड ६०.कवन ६२.डझन ६३.अग्र ६४.बंधन ६७.बोकड ६९.वारेमाप ७०.उपरा ७१.वर्धमान ७२.कादंबरी ७३.मदत ७४.हार ७५.विचार ७८.कल ८०.जरा




# मालिका गमावल्यानंतर पंतने मागितली माफी



नवी दिल्ली–भारताला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत २–० असा पराभव स्वीकारावा लागला. दुसऱ्या कसोटीत नियमित कर्णधार शुभमन गिल दुखापतग्रस्त असल्यानं रिषभ पंतकडे कर्णधारपद देण्यात आलं होतं. गुवाहाटी कसोटीत भारताचा ४०८ धावांनी पराभव झाला होता. कोलकाता कसोटीत भारताला ३० धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. दुसऱ्या कसोटीतील पराभवानंतर टीम इंडियावर आणि प्रशिक्षक गौतम गंभीरवर जोरदार टीका केली जात आहे. गुवाहाटी कसोटीतील पराभवानंतर रिषभ पंतनं एक पोस्ट करत क्रिकेट चाहत्यांची माफी मागितली आहे.टीम इंडियाने कसोटी मालिकेत चांगली कामगिरी केली नाही हे रिषभ पंतने स्वीकारले आहे. रिषभ पंत म्हणाला की मफही गोष्ट कोणीही नाकारु शकत नाही की आम्ही गेल्या दोन आठवड्यांमध्ये चांगले क्रिकेट खेळले नाही. एक टीम आणि एक व्यक्ती म्हणून, आम्ही नेहमीच चांगली कामगिरी करु इच्छितो आणि अब्जावधी भारतीयांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा प्रयत्न करतोफ्फ्ररिषभ पंतने पुढे म्हटले की, माफ करा आम्ही यावेळी अपेक्षा पूर्ण करु शकलो नाही. मात्र, खेळ तुम्हाला शिकणे, गोष्टी स्वीकारणे आणि पुढे जाणे शिकवतो. एक टीम म्हणून आणि एक व्यक्ती म्हणून भारताचे प्रतिनिधीत्व करणे आमच्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आहे, असे रिषभ पंतने म्हटले.

रिषभ पंतने पुढे म्हटले की, मफआपल्याला माहिती आहे की ही टीम काय करु शकते. आम्ही एक टीम आणि एक व्यक्ती म्हणून ताकदीने आणि चांगल्या प्रकारे पुनरागमन करण्यासाठी कष्ट करु, पुन्हा एकत्र होऊ,लक्ष केंद्रीत करु आणि नव्याने सुरुवात करु, तुमच्या पाठिंब्यासाठी आणि प्रेमासाठी धन्यवाद असे, रिषभ पंतने म्हटले.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीचा प्रवास खडतर

भारताचे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या २०२५–२०२७ च्या सायकलमध्ये आता ९ कसोटी सामने शिल्लक आहेत. भारताला ९ पैकी ७–८ मॅच जिंकाव्या लागतील. भारतानं यापुढे दोन कसोटी सामने गमावल्यास त्यांचा अंतिम फेरीत पोहोण्याचा मार्ग बंद होऊ शकतो. भारतीय क्रिकेट संघ सध्या डब्ल्यूटीसीच्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया पहिल्या, दक्षिण आफ्रिका दुसऱ्या, श्रीलंका तिसऱ्या, पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे.

# आयसीसी चा अजब न्याय... दोन दिवसांत संपलेली पर्थ कसोटी

मुंबई–कसोटी क्रिकेटमधील खेळपट्टी मूल्यांकनाबद्दलची चर्चा अलीकडच्या दिवसांत जोर पकडत आहे. अशातच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने एक मोठा निर्णय घेत पर्थ स्टेडियमवरील फक्त दोन दिवस चाललेल्या ॲशेज कसोटीला मवेरी गुडफ म्हणजेच मअत्यंत उत्तमफ अशी सर्वोच्च रेटिंग दिली आहे.

दुसरीकडे, भारतात झालेल्या अलीकडच्या कसोटी सामन्यांच्या खेळपट्टीला फक्त मसॅटिसफॅक्टरीफ (संतोषजनक) असे दर्जा मिळाला. त्यामुळेच हा प्रश्न उठू लागला आहे, आयसीसीच्या रेटिंग प्रणालीमध्ये काही असमानता आहे का?दोन दिवसात संपला सामना तरीही मवेरी गुडफ

पर्थमधला सामना फक्त ८४७ चेंडूत संपला. ऑस्ट्रेलियातील हा दुसरा सर्वात लहान कसोटी आणि १८८८ नंतरच्या ॲशेज इतिहासातील सर्वात पटकन संपलेला सामना आहे. पहिल्याच दिवशी १९ विकेट्स पडल्या. तरीही सामना रेफरी रंजन मदुगाले यांनी पिचची प्रशंसा केली आणि आयसीसीने ते खराब न ठरवता उलट मफ्फअत्यंत उत्तमफ्फ रेटिंग दिली.मग भारतातील खेळपट्टीवर फक्त मसंतोषजनकफ का?याच दरम्यान भारतात वेस्ट इंडीजविरुद्ध खेळल्या गेलेल्या अहमदाबाद आणि दिल्ली कसोटीच्या खेळपट्टींना रेफरी अँडी पाइक्रॉफ्ट यांनी मसंतोषजनकफ असे रेट केले. विशेष म्हणजे हे सामने ३ ते ५ दिवस चालले होते. म्हणजे वेळेआधी संपले नव्हते.

# घटस्फोटाच्या वर्षभरातच युजवेंद्र चहल पुन्हा बोहल्यावर चढायला तयार

मुंबई–टीम इंडियाचा स्टार गोलंदाज युजवेंद्र चहल हा मागील अनेक महिन्यांपासून टीम इंडियाच्या बाहेर असला तरी अनेक कारणांमुळे नेहमी चर्चेत येत असतो. याचवर्षी फेब्रुवारी महिन्यात पूर्व पत्नी आणि कोरिग्राफर धनश्री वर्मा हिच्याशी त्याचा घटस्फोट झाला होता. लग्नाच्या काही वर्षातच दोघे वेगळे झाले. त्यानंतर दोन्ही बाजुंनी अनेक आरोप प्रत्यारोप करण्यात आले. युजवेंद्र चहलने नुकतीच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली याखाली लिहिलेल्या कॅप्शनने सर्वानाच लक्ष वेधून घेतलं. भारताचा स्टार क्रिकेटर युझवेंद्र चहल आणि पूर्व पत्नी धनश्री वर्मा यांचा फेब्रुवारी २०२५ रोजी घटस्फोट झाला. दोघांनी २०२० मध्ये लग्न केलं होतं. मात्र त्यांचं लग्न केवळ १८ महिने चाललं आणि त्यांच्या नात्यात सर्वकाही ठीक नव्हतं त्यामुळे २०२२ पासून ते वेगळे राहत होते अशी माहिती कोर्टात सादर करण्यात आली. अखेर मुंबई कौटुंबिक न्यायालयाने या दोघांच्या घटस्फोटावर निर्णय दिला आणि दोघे विभक्त झाले. त्यांच्या घटस्फोटानंतर दोघे वेगळे का झाले याची अनेक कारण समोर आली. एका शोमध्ये धनश्रीने युजवेंद्र तिच्या सोबत चिट करत होता असं म्हटलं. तर काही मीडिया रिपोर्ट्समधून धनश्रीला मुंबईला राहायची इच्छा होती, आणि तिने युजवेंद्रला हरियाणातील आपलं घर सोडून मुंबईला शिफ्ट होण्यासाठी सांगितलं होतं. पण युजवेंद्रला त्याचे आई वडील आणि कुटुंबासोबत हरियाणाच्या राहायचे होते. यारून त्यांच्यात बरेच वाद सुद्धा झाले अशी कारणं समोर आली. युझवेंद्रला पुन्हा करायचं लग्न? युझवेंद्र चहलने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. यात तो काळ्या रंगाच्या कोटमध्ये दिसला. या फोटोला युझवेंद्रने कॅप्शन लिहिलं की, 'लग्नासाठी तयार आहे फक्त मुलगी पाहिजे...' या कॅप्शन सह त्याने हसण्याचे ईमोजी टाकले. युझवेंद्र आणि धनश्री यांच्या घटस्फोटानंतर युझवेंद्रचं नाव आरजे महिवशशी जोडलं गेलं. अनेकदा आयपीएल सामन्यात ती त्याला चिअर करताना दिसली. तसेच दोघांनी एकत्र सोशल मीडियावर काही फोटो सुद्धा शेअर केले होते.

धनश्रीला युझवेंद्रकडून पोटगीत मिळाले ४.७५ कोटी रुपये:

घटस्फोट झाल्यावर धनश्रीला युझवेंद्रकडून ४.७५ कोटी रुपये पोटगी म्हणून मिळाले आहेत. कोर्टात सादर केलेल्या कागदपत्रांनुसार चहल आणि धनश्री हे दोघे २०२० मध्ये लग्न बंधनात अडकले. परंतु त्यांच्या नात्यात सर्वकाही नीट नव्हते त्यामुळे २०२२ पासून ते वेगळे राहतायत. अखेर काही महिन्यांपूर्वी त्यांनी मुंबईच्या कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटाची याचिका दाखल केली. तसेच हायकोर्टाने त्यांचा सहा महिन्यांचा कुलिंग पिरिएड सुद्धा माफ केल्याने त्यांच्या घटस्फोटावर लवकर निर्णय झाला त्यांचा घटस्फोट २० मार्च २०२५ रोजी अधिकृतपणे निश्चित झाला.

## भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान

# एकदिवसीय सामन्यांची मालिका कोण मारणार बाजी ?



**रांची :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांची कसोटी मालिका दक्षिण आफ्रिकेने ०–२ अशी जिंकली. दोन्ही सामन्यात भारताचा लाजीरवाणा पराभव झाला. या धक्क्यातून सावरत भारतीय संघ एकदिवसीय मालिकेसाठी सज्ज होत आहे. वेळापत्रकानुसार रविवार ३० नोव्हेंबर २०२५ पासून भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू होणार आहे. मालिकेतील पहिला सामना झारखंडमधील जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियम कॉम्प्लेक्समध्ये ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १:३० वाजता सुरू होईल. भारत आणि दक्षिण आफ्रिका एकदिवसीय सामन्यांमध्ये ९४ वेळा एकमेकांसमोर आले आहेत. दक्षिण आफ्रिकेने ९४ पैकी ५१ सामने जिंकले आहेत तर भारतीय संघाने ४० सामने जिंकले आहेत आणि तीन सामने अनिर्णित राहिले आहेत. भारतीय संघाने घरच्या मैदानावर १८ सामने जिंकले आहेत, तर दक्षिण आफ्रिकेने २६ सामने जिंकले आहेत. परदेशात, भारतीय संघाने १२ सामने जिंकले आहेत, तर दक्षिण आफ्रिकेने १४ सामने जिंकले आहेत. तटस्थ ठिकाणी झालेल्या सामन्यांपैकी १० सामने भारताने आणि ११ सामने दक्षिण आफ्रिकेने जिंकले आहेत.

एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघ केएल राहुल (कर्णधार/यष्टीरक्षक), रिषभ पंत (उपकर्णधार/यष्टीरक्षक), रोहित शर्मा, विराट कोहली, यशस्वी जयस्वाल, तिलक वर्मा, ऋतुराज गायकवाड, वॉशिंग्टन सुंदर, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, नितीश कुमार रेड्डी, हर्षित राणा, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंह और ध्रुव जुरेल भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका पहिला सामना – ३० नोव्हेंबर २०२५ – रांची, झारखंड दुसरा सामना – ०३ डिसेंबर २०२५ – रायपूर, छत्तीसगड तिसरा सामना – ०६ डिसेंबर २०२५ – विशाखापट्टणम (वायझॅग), आंध्र प्रदेश

## भारतात बास्केटबॉल कोर्टवर मृत्यूचा खेळ! ३ दिवसांत २ खेळाडूंनी गमावले जीव पण जबाबदार कोण?

दिल्ली–हरियाणातील खेळाडू इंटरनॅशनल लेव्हलवर देशाचं नाव मोठं करतात, तिथे खेळांना प्रोत्साहन दिलं जातंष्ठ पण गेल्या काही दिवसांतील दोन भीषण घटनांनी सिस्टमचं खरं रूप जगासमोर आलं आहे. निष्काळजीपणा आणि भ्रष्ट व्यवस्थेची पोलखोल झाली. रोहतक आणि बहादुरगड येथे बास्केटबॉलचा पोल अंगावर पडून राष्ट्रीय स्तरावरील दोन तरुण खेळाडूंनी जीव गमावला आहे. रोहतकच्या लाखन माजरा गावातील कोर्टात १६ वर्षाचा हार्दिक राठी जो नेशनल लेव्हलचा खेळाडू आहे. बुधवारी सकाळी एकटाच सराव करत होता. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसतं की हार्दिक पोलकडे धावत जातो, त्याला पकडतो, आणि पुढच्याच क्षणी ७५० किलो वजनाचा लोखंडी पोल त्याच्या अंगावर पडतो. शेजारील खेळाडूंनी त्याला तातडीने बाहेर काढून रोहतकच्या दवाखान्यात नेलं. पण डॉक्टरांनी हार्दिकला मृत घोषित केलं. हार्दिक १०वीचा विद्यार्थी, राष्ट्रीय पातळीवर पदकं मिळवलेला टॅलेंटेड खेळाडू होता. पण सिस्टिमच्या बेजबाबदारपणाचा बळी ठरला.या दुर्घटनेच्या काही दिवस आधी बहादुरगडच्या होशियारसिंह स्टेडियममध्ये १५ वर्षीय अमन ट्रेनिंग करत होता. अचानक पोल पडला, अमन गंभीर जखमी झाला. त्यालाही दवाखान्यामध्ये दाखल करण्यात आलं, पण उपचारादरम्यान त्यानेही प्राण गमावले. सिस्टिम फेल! व्यवस्थापनाचा निष्काळजीपणा... या दोन अपघातांमुळे क्रीडा व्यवस्थापन आणि यंत्रणेचे अपयश उघड झाले आहे. क्रीडा मैदानांमधील पोलची खराब स्थिती आणि नियमित तपासणीचा अभाव हे यातून दिसून येते. अशा घटनांचा थेट संबंध देखभाल आणि देखरेखीच्या अभावाशी आहे. भ्रष्टाचार देखील यात सामील असू शकतो, कारण खेळांसाठी राखीव ठेवलेले बजेट मैदानावर वापरले जात नाही.लोक या दोन तरुण खेळाडूंच्या मृत्यूला अपघात नाही तर गुन्हा म्हणत आहेत. जनता आणि कुटुंबे आग्रह धरतात की हे जाणूनबुजून केलेले निष्काळजीपणा होते आणि भविष्यात खेळाडूंचे मृत्यू रोखण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा.

# आधी पराभव मग एअरपोर्टवर ड्रामा, सिराजने असं काय केलं ज्याने मागावी लागली माफी?




मुंबई–भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियममध्ये खेळला गेला. या सामन्यात आफ्रिकन संघाने तब्बल ४०८ धावांनी विजय मिळवत मालिका २–० ने खिशात घातली. मोहम्मद सिराज यांनी सोशल मीडियाद्वारे आपला राग व्यक्त केला आहे. तथापि, त्यांचा राग दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवावर नाही तर एअर इंडियाच्या विमानाच्या विलंबावर आहे. त्यांनी एका पोस्टमध्ये आपला राग व्यक्त केला, ज्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की त्यांच्या विमानाला सुमारे चार तास उशीर झाला.

ट्विटरवर पोस्ट करताना, ३१ वर्षीय वेगवान गोलंदाजाने लिहिले की, मफ्गुवाहाटीहून हैदराबादला जाणारी एअर इंडियाची फ्लाइट खद २८८४ सकाळी ७:२५ वाजता निघणार होती. तथापि, एअरलाइनकडून कोणतीही माहिती मिळालेली नाही आणि वारंवार कॉल करूनही त्यांनी कोणतेही वैध कारण नसतानाही उड्डाणाला उशीर केला आहे. हे खरोखर निराशाजनक आहे आणि प्रत्येक प्रवासी जाणून घेऊ इच्छितो. विमान चार तास उशिरा आहे आणि अद्याप कोणतेही अपडेट मिळालेले नाहीत. आम्ही अडकलो आहोत. आतापर्यंतचा सर्वात वाईट अनुभव. जोपर्यंत ते कारवाई करत नाहीत तोपर्यंत मी कोणालाही या फ्लाइटने प्रवास करण्याची शिफारस करणार नाही.टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने सोशल मीडियावर विमानाच्या विलंबाबद्दल संताप व्यक्त केल्यानंतर, एअर इंडियाने त्यांना प्रतिक्रिया दिली. सिराजच्या पोस्टला प्रतिसाद देत एअर इंडियाने त्यांना सांगितले, मफ्फ्री. सिराज, झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही मनापासून दिलगीर आहोत. अनपेक्षित ऑपरेशनल कारणांमुळे, फ्लाइट रद्द करण्यात आली आहे हे कळवण्यास आम्हाला खेद होत आहे.फ्फ

# पुजाराच्या मेहुण्याची आत्महत्या!

## बलात्काराचा आरोप अन् एका वर्षात जीवन संपवले

राजकोट–भारतीय क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील नातेसंबंधामुळे चर्चेत आला आहे. पुजाराचा मेहुणा जीत रसिखभाई पाबरीवर याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी तपास सुरू झाला आहे. एका तरुणीने जीत विरोधात २६ नोव्हेंबर २०२४ रोजी बलात्काराची तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाला एक वर्ष पूर्ण होताच जीतने आत्महत्या केली असल्याने त्याच्या आत्महत्येसाठीचे प्राथमिक कारण हेच सांगितले जात आहे. लग्नाचे आश्वासन देऊन शरीरसंबंध ठेवल्याचा आरोप या तरुणीने तक्रारीमध्ये केला होता. यामुळे तणावाखाली आलेल्या जीतने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.




जीत पाबरी विरोधात एका तरुणीने २६ नोव्हेंबर २०२४ रोजी मालवीय नगर पोलिसात बलात्काराची तक्रार दाखल केली होती. या तरुणीसोबत जीतचा साखरपुडा झाला होता. पण पुढे दोघांमध्ये काहीतरी बिनसल्याने त्यांनी नातेसंबंध तोडून टाकले. त्यानंतर तरुणीने जीत विरोधात बलात्काराची तक्रार नोंदवली. लग्नाचे आश्वासन देऊन साखरपुडा झाल्यावर जीतने अनेकदा जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले आणि नंतर लग्न मोडले, असे गंभीर आरोप तरुणीने केले. या प्रकरणामुळे जीत विरोधात तक्रार दाखल झाल्यानंतर वर्षभरातच जीतने आत्महत्या करत जीवन संपवले. यावेळी चेतेश्वर पुजारा भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यात समालोचन करत होता. मिळालेल्या माहितीनुसार, जीत गेल्या वर्षभरापासून कायदेशीर खटल्याचा सामना करत होता. यामुळे तो बराच ताणतणावात होता. पण आत्महत्येमागील नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि पुढील चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे,असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. चेतेश्वर पुजारा यांची सासरवाडी जामजोधपूरमध्ये आहे. पण त्याच्या सासरचे लोक गेल्या २० वर्षापासून राजकोटमध्येच वास्तव्यास असून ते कॉटन जिनिंग फॅक्ट्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्या मालकीचा एक कारखाना आहे.

# मैत्रीण असावी तर अशी! स्मृती मानधनाच्या कठीण काळात दिलासा देण्यासाठी जेमिमा



रॉड्रिग्जने घेतला मोठा निर्णय

मुंबई,२७ नोव्हेंबर –भारतीय महिला संघाची स्टार ओपनिंग बॅट्समन स्मृती मानधना २३ नोव्हेंबर रोजी पलाश मुच्छलसोबत लग्न करणार होती. या लग्नासाठी टीम इंडियाच्या अनेक महिला खेळाडू स्मृतीच्या घरी पोहोचल्या होत्या, त्यापैकी एक जेमिमा रॉड्रिग्ज होती. लग्नाच्या एक दिवस आधी, स्मृती मानधना यांच्या वडिलांची तब्येत अचानक बिघडल्यामुळे, लग्न पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला, ज्यामुळे सर्वजण निराश झाले होते. दरम्यान, स्मृतीच्या जवळच्या मैत्रिणींपैकी एक असलेल्या जेमिमाने या कठीण काळात तिला साथ देण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे.

ऑस्ट्रेलियात खेळल्या जाणाऱ्या महिला बिग बॅश लीगच्या चालू हंगामात जेमिमा रॉड्रिग्ज ब्रिस्बेन हीट संघाचा भाग होती. २०२५ च्या महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या समाप्तीनंतर ती सहभागी होण्यासाठी आली होती. स्मृतीच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी जेमिमा देशात परतली होती, त्यानंतर ती पुन्हा ऑस्ट्रेलियाला रवाना होणार होती. तथापि, येथे आल्यानंतर, अचानक परिस्थिती बदलल्यामुळे, जेमिमाने या कठीण काळात स्मृतीसोबत राहण्याचा निर्णय घेतला. याबद्दल, जेमिमाने ब्रिस्बेन हीट फ्रँचायझीला उर्वरित चार सामन्यांसाठी तिला परत बोलावू नये अशी विनंती केली, जी फ्रँचायझीने मान्य केली.

ब्रिस्बेन हीटचे सीईओ टेरी सेव्हनसन यांनी जेमिमा रॉड्रिग्ज यांच्याबद्दल जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्मृती मानधनाच्या वडिलांच्या अचानक आजारामुळे, जेमिमा यांनी या कठीण काळात त्यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, ती ॅ २०२५ हंगामातील उर्वरित सामन्यांमध्ये भाग घेणार नाही. आम्ही सहभागी न होण्याची तिची विनंती स्वीकारली आहे आणि ती भारतातच राहील. स्मृतीच्या वडिलांना लवकर बरे व्हावे आणि कुटुंबाला भविष्यासाठी शुभेच्छा देतो. जेमीने आम्हाला सांगितले की ती परत येऊ न शकल्याने निराश आहे आणि परिस्थिती समजून घेतल्याबद्दल क्लब आणि हीट चाहत्यांचे कौतुक केले आहे. गेल्या काही महिन्यात भारतीय महिला संघातील फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जच्या आयुष्यात अनेक चढउतार आले आहेत. ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या वर्ल्डकप सेमीफायनल सामन्यात तिने दमदार शतकी खेळी केली होती. भारतीय संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून पहिल्यांदाच जेतेपदाचा मान पटकावला. त्यानंतर जेमिमा आणि भारतीय संघातील इतर खेळाडू स्मृती मानधानाच्या लग्नासाठी सांगलीत गेले होते. स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल यांचा विवाह होणार होता. पण स्मृतीच्या वडिलांची प्रकृती अचानक बिघडल्याने हा विवाह अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. दरम्यान स्मृतीच्या कठीण काळात तिला पाठींबा देण्यासाठी जेमिमा रॉड्रिग्जने मोठा निर्णय घेतला आहे.ऑस्ट्रेलियात सध्या वुमन्स बिग बॅश लीग २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. जेमिमा रॉड्रिग्ज या स्पर्धेत ब्रिसबेन हिट संघाचा भाग आहे. महिला वर्ल्डकप स्पर्धा झाल्यानंतर ती ही स्पर्धा खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाला गेली होती. पण स्मृती मानधनाच्या लग्नासाठी ती भारतात परतली होती. पण स्मृतीसोबत जे काही घडलं, त्यातून तिला बाहेर काढण्यासाठी आणि तिला सपोर्ट करण्यासाठी तिने ऑस्ट्रेलियाला न जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ती ब्रिसबेन हिट संघाचे शेवटचे ४ सामने खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाला जाणार नाही. जेमिमा रॉड्रिग्जने ब्रिसबेन हिट संघाला, तिला स्पर्धेतून रिलीज करण्यात यावं अशी विनंती केली होती. ब्रिसबेन हिट संघाच्या संघ व्यावस्थापकांनी या विनंतीला मान देऊन तिला रिलीज करण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रिसबेन हिट संघाचे सीईओ टेरी सेवेन्सन म्हणाले की, मफ्फजेमिमासाठी हा कठीण काळ आहे. ती वुमन्स बिग बॅश लीग स्पर्धेतील शेवटच्या ४ सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही, हे निराशाजनक आहे. पण तिला भारतात थांबायचं आहे आणि आम्ही तिच्या या निर्णयाचा आदर करतो. ब्रिसबेन हिट जेमिमा आणि मानधना कुटुंबासोबत आहे. वर्ल्डकप २०२५ स्पर्धा सुरू असतानाच स्मृती मानधना आणि गायक पलाश मुच्छल यांचा विवाह होणार अशी चर्चा रंगली होती.

हा विवाहसोहळा २३ नोव्हेंबरला सांगलीत होणार होता. पण लग्नाच्या काही तासांआधीच स्मृतीच्या वडिलांची अचानक तब्येत बिघडली. त्यामुळे त्यांना तत्काळ रुग्णालयात घेऊन जाण्यात आलं. त्यानंतर पलाश मुच्छलची देखील तब्येत बिघडली होती. त्यामुळे त्याला देखील रुग्णालयात भरती करण्यात आले होते. आता स्मृतीच्या वडिलांच्या तब्येतीत सुधारणा झाली असल्याचे म्हटले जात आहे.

# रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत भ्रष्टाचाऱ्यांना दुर सारून जनतेच्या प्रश्नांची जाण असलेल्या काँग्रेस उमेदवारांना निवडून द्या

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे मतदारांना आवाहन

**रेणापूर/प्रतिनिधी :** सध्या होत असलेल्या रेणापूर नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेचे अध्यक्ष,माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांना काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वी ज्यांना मतदारांनी सत्तेची संधी दिली, त्यांनी जनतेच्या कामांऐवजी केवळ भ्रष्टाचार केला, असा आरोप त्यांनी केला.



नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार माने अर्चना प्रदीप,वॉर्ड क्रमांक १ मधील काँग्रेस पक्षाचे उमेदवार प्रदीप सुधाकर काळे, वॉर्ड क्रमांक २ च्या उमेदवार कांताबाई हिरामन राठोड,वॉर्ड क्रमांक ३ चे उमेदवार आकनगिरे पुजा प्रशांत,वॉर्ड क्रमांक ४ चे उमेदवार अजयकुमार भिवा चक्रे,वॉर्ड क्रमांक ५ चे उमेदवार गोविंद प्रभू भोकरे, वॉर्ड क्रमांक ६ च्या उमेदवार शीतल अतुल कातळे,वॉर्ड क्रमांक ७ चे सचिन अनुरथ मोटेगावकर यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीत मतदारांशी संवाद साधताना धिरज देशमुख म्हणाले की, महाविकास आघाडीच्या काळात रेणापूर नगरपंचायतीसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, सत्ताधारी भाजपच्या नेत्यांनी हा निधी रेणापूरच्या विकासकामांवर खर्च करण्याऐवजी स्वतःच्या खिशात घातला. भाजपच्या याच भ्रष्टाचारी कारभारामुळे जनतेची कामे झाली नाहीत आणि जनतेला वेठीस धरण्याचे काम भाजपने केले, काँग्रेसची सत्ता आल्यास या भ्रष्ट लोकांवर योग्य ती कार्यवाही केली जाईल असेही त्यांनी सांगितले.

स्वच्छ चारित्र्याच्या उमेदवारांना संधी देण्याचे आवाहन

धिरज देशमुख यांनी यावेळी मतदारांना आवाहन केले की, भ्रष्टाचारी उमेदवारांना बाजूला सारून प्रामाणिक उमेदवारांना निवडण्याची हीच ती योग्य वेळ आहे. काँग्रेसने जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले आणि स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार निवडणुकीत उतरवले आहेत. त्यामुळे मतदारांनी मतदानरूपी आशीर्वाद देऊन काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करावे आवाहन त्यांनी केले.

या प्रचारात काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी मतदारसंघ पिंजून काढला असून ठिकठिकाणी मतदार त्यांचे स्वागत करताना दिसत आहेत. त्यामुळे काँग्रेसने प्रचारात आघाडी घेतली आहे. याउलट भाजपा नेत्यांना व उमेदवारांना मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागत असून रेणापूरच्या विकासासाठी काय केले, असा जाब विचारला जात आहे. मतदारांच्या या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांची चांगलीच पंचाईत होते आहे.

एकूणच रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली असून सत्ताधारी भाजपावरील रोष पाहता काँग्रेस मोठ्या मताधिक्याच्या फरकाने विजयी होईल असा हा विश्वास काँग्रेस नेत्यांसह मतदारांमधून व्यक्त केला जात आहे.

प्रचार बैठकीस उमेदवार, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते,मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दयानंद विज्ञानमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील कार्यालय,राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्र.प्राचार्य डॉ.श्याम इबाते यांनी भारतीय संविधानावर प्रकाशझोत टाकणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि भारतीय संविधानाचे संवर्धन व जागर करावा,यासाठी सर्वांना भारतीय संविधान दिनाच्या शुभेच्छाही दिल्या.याचबरोबर उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांच्यासमवेत सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्येशिकेचे सामूहिक वाचन केले.

याप्रसंगी पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, बन्सी कांबळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे, डॉ.अमोल ठोसर,भाषा विभागातील डॉ.गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार, डॉ. रोहिणी शिंदे, डॉ.नाथराव केदार, डॉ.महेश करळे, सतिश तांदळे, सुदाम सातपुते, किशोर जाधव, शशिकांत गर्जे, शेषराव बिराजदार, विशाल टार्फे,श्रावण माळी,अर्चना शर्मा,बाबासाहेब बचाटे, सुदर्शन काळे,सागर इंदाणी,रवी लाहोटी,पोपट बाजपाई यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्यावतीने संविधान दिन साजरा




**धाराशिव/प्रतिनिधी :** धाराशिव येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी धाराशिव शाखेच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी संघटनेचे अरुणभाऊ बनसोडे, बाळासाहेब माने, विजय गायकवाड, अशोक बनसोडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे राजेंद्र धावारे, बलभीम कांबळे, श्रीकांत माळाळे, राजन माने, ॲड. दिलीप काळे, दलितमित्र शंकर खुने, दिपक सरवदे, एस.के. शेरखाने, प्रभाकर बनसोडे, दिलीप वाघमारे, सुदेश माळाळे, पांडूरंग सवाई, धनंजय वाघमारे, अच्युत सरवदे इत्यादींची उपस्थिती होती.

### दयानंद शिक्षण संस्थेतर्फे २१ लाख रुपये मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधी सुपूर्त



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था ही १९६१ पासून शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असलेली शैक्षणिक संस्था असून ती अनेक सामाजिक व शैक्षणिक पुरस्कारांनी सन्मानित झालेली शिक्षण संस्था आहे.देशावर येणाऱ्या अनेक संकट काळी मदतीसाठी संस्था नेहमी अग्रेसर असते.याचाच भाग म्हणून यावर्षी महाराष्ट्रावर आलेली पूरस्थिती,अशा या संकटकाळी संस्थेनी मदतीचा हात म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधी देण्याचा ठाम निर्धार केला.दयानंद शिक्षण संस्थेतंर्गत कार्यरत असलेल्या सर्वच महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन रुपये १४,२२,६४५/- एवढे जमा झाले.यामध्ये संस्थेच्या वतीने रूपये ६,७७,३५५/- भर घालून मुख्यमंत्री सहाय्यता निधी म्हणून रूपये २१,००,०००/- धनादेश क्रमांक ०२४७११ जनता सहकारी बँक,पुणे शाखा,लातूर मार्फत दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी मा.जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्याकडे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी सुपूर्त केला. याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ललितभाई शाह,संयुक्त सचिव विशाल लाहोटी,सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे,कोषाध्यक्ष संजय बोरा,दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

## सरस्वती महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून ''संविधान दिन'' उत्साहात साजरा करण्यात आला.महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. राम बोरगावकर,प्रभारी प्राचार्य डॉ. सुदाम पवार व प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. आर.एन. जाधव यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुदाम पवार ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. बालाजी शिंदे,महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.रवि चव्हाण,प्रा. डॉ.वसंत बंडे,प्रा.पांडुरंग गोरे,डॉ.राम खलंग्रे,डॉ.संतोष कुलकर्णी,प्रा.अमोल जाधव,प्रा. डॉ.मोनालिसा खानोरकर, प्रा. ज्योती मामडगे,प्रा.सलील शहाजिंदे,प्रा.तुकाराम येमले,प्रा. श्रीमंत दोरवे ,श्री.बळीराम कदम आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा.डॉ.आर.एन.जाधव यांनी '' भारतीय संविधानातील मूल्यविचार '' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

## मांजरा साखर कारखाना परिसरात वाहन चालकांना रस्ता सुरक्षेचे धडे



**लातूर/प्रतिनिधी:** विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे कारखान्याचे चेअरमन तथा माजी मंत्री माननीय श्री दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या सूचनेनुसार मांजरा कारखाना व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा सप्ताह अंतर्गत वाहन चालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना रिफ्लेक्टर चे महत्व सांगण्यात आले सध्या ऊस गाळात हंगाम सुरू असून असंख्य वाहने उसाची वाहतूक करतात. त्यामुळे संबंधित वाहन चालकांनी रस्ते वाहतुकीसाठी असलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून वाहनांना रिफ्लेक्टर बसवण्याचे महत्व विशद करण्यात आले. तसेच ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर वाटप करण्यात आले.यावेळी प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर येथील मोटार वाहन निरीक्षक श्री सागर भोसले व श्री ओंकार कातोरे, कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी श्री विनयकुमार टमके, चीफ अकाउंटंट श्री शरद साळुंखे सहाय्यक शेतकी अधिकारी श्री ए पी पवार ऊस वाहतूक करणारे ड्रायव्हर यांची उपस्थिती होती.

# रेणापूरच्या विकासाची गती वाढवण्यासाठी भाजपाला साथ द्या

## विकास हीच भाजपाची ओळख युवा नेते अभिषेक आकनगिरे यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीत भाजपाला भरभरून आशीर्वाद दिले. मिळालेल्या सत्तेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये खर्चाच्या सर्वांगीण विकासाची कामे करण्यात यश आले. विकास कामे करूनच भाजपा मताचे दान मागत आहे. विकास हीच भाजपाची ओळख बनली असून विकास कामाची गती कायम ठेवण्यासाठी किंबहुना वाढविण्यासाठी पुन्हा भाजपाला साथ द्या, भक्कमपणे भाजपाच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष, भाजपाचे युवानेते अभिषेक आकनगिरे यांनी केले.

रेणापूर नगरपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने युवा नेते अभिषेक आकनगिरे हे रेणापूर शहरातील विविध प्रभागात प्रचार बैठका घेत आहेत. या प्रचार बैठकांना मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून विविध ठिकाणच्या बैठकीतून मतदारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र आणि राज्यात भाजप सरकारच्या माध्यमातून लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली रेणापूर नगरीतील मतदारांच्या विश्वासाला पात्र राहत मूलभूत गरजा पुरवण्याबरोबरच जनहिताच्या विकास कामांना गती देण्याचे काम आम्ही केले. नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. यामुळे रेणापूर शहरासह वाडी - तांड्यातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाला.

शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास कामे केल्याने शहराचा चेहरा-मोहरा बदलून गेला. खेडे असणारे रेणापूर विकसित शहर बनले असल्याचे सांगून अभिषेक आकनगिरे म्हणाले की, ज्या गावात रस्त्यावरून चालणे कठीण होते, चिखलामध्ये गुडघ्या एवढे पाय रुतत होते त्या शहराच्या प्रत्येक गल्लीबोळात आम्ही सिमेंट काँक्रीटचे





रस्ते बनवले, गटारी बांधल्या. नवीन जलवाहिन्या टाकल्या. एक ना अनेक विकास कामे केली. रेणापूरची नवी ओळख निर्माण करण्याचे काम केले.

रेणापूरच्या जनतेने हा विकास पाहिलेला आहे. झालेली कामे समोर आहेत. घरकुलसह विविध शासनाच्या योजनांचा लाभ वैयक्तिक पातळीवर अनेकांना मिळालेला आहे. विकास काय असतो ? हे रेणापूरकरांनी अनुभवले आहे. विकास हीच भाजपाची ओळख बनली आहे. याच पाठबळावर आम्ही मते मागत आहोत, येणाऱ्या काळातही विकासाची गती अधिक करण्यासाठी भाजपाला साथ द्या असेही अभिषेक आकनगिरे म्हणाले.

या बैठकांना त्या- त्या प्रभागातील उमेदवार, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विशेष कर वसुली शिबिराचे आयोजन दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी शिबिर

- शास्तीत ८०% सुट मिळवण्याची यावर्षातील शेवटची संधी
- मनपाचे थकबाकीदार यांना पुन्हा एकदा शास्ती सुटची भेट

**लातूर/प्रतिनिधी :** कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिकामार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच संपूर्ण कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून कर संकलन केले जात आहे. त्यादृष्टीने नियमितपणे कर भरणारे मालमत्ताधारकांसाठी वर्षाच्या सुरुवातीस विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. तसेच थकबाकीदार यांच्या कडील थकीत कर वसुलीस चालना देण्यासाठी यापूर्वी वेळोवेळी शास्ती माफी योजना लागू करण्यात आले होती. तथापि काही थकबाकीदार प्रतिसाद देत नसल्याने, सद्यस्थितीत थकबाकीदार मालमत्ता धारकावर जप्ती ची धडक कार्यवाही करण्यात येत आहे . पण तत्पूर्वी थकबाकीदार याना टॅक्स भरण्याची संधी मिळावी या दृष्टीने आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांच्या नियोजनातून दि ३० नोव्हेंबर रोजी विशेष कर वसुली शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात थकीत टॅक्स भरणारे मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर ८०% शास्ती माफी देण्याचा निर्णय घेण्यात आहे. तरी दि.३० नोव्हेंबर २०२५ रविवारी सकाळी १० ते ५ या वेळात महानगरपालिका मुख्यालय येथे सदरील शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तरी अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे .

या शिबिरापूर्वी ४००० थकबाकीदार मालमत्ता धारकाना नोटीस बजावण्यात येणार असून या शिबिरासाठी देण्यात येणारी ८०% शास्ती माफी ही या वर्षातील शेवटची शास्ती माफी योजना असल्याने अधिकाधिक मालमत्ताधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा व १ डिसेंबर पासून सुरू होणारी जप्ती कार्यवाही टाळावी असे आवाहन मनपा उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# हमीद शेख सर्वधर्म-समभाव जोपासणारा निस्वार्थी उमेदवार : रिपाई नेते विलास सूर्यवंशी

**निलंगा/अयुब बागवान :** निलंगा हि सर्वधर्म समभाव जपणारी भूमी म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी सर्व जाती धर्मीयांचे सण उत्सव सर्वजण एकत्रित येऊन साजरे करतात. काँग्रेस पक्षाने हमीद शेख यांच्या सारखा सर्वधर्म समभाव जोपासणाऱ्या व्यक्तीला उमेदवारी देऊन खऱ्या अर्थाने एका कार्यकर्त्याला न्याय देण्याचे काम केले आहे. नगराध्यक्ष म्हणून हमीद शेख यांनी केलेले काम आजही निलंगा शहरातील नागरिक विसरला नसून मागे त्यांना केवळ एक वर्षाची संधी मिळाली होती. निलंगा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हमीद शेख यांच्या सारख्या सक्षम उमेदवाराला पाच वर्षांसाठी नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन रिपाई नेते विलास सूर्यवंशी यांनी केले.



निलंगा नगरपालिका नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हमीद शेख व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रभाग दहा व आकरा मध्ये आयोजित कॅर्नर बैठकीत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हमीद शेख, नगरसेवक पदाचे उमेदवार गिरीश पात्रे, कौशल्या कांबळे, इलाही चौधरी, स्वाती सूर्यवंशी, राधिका पेठकर, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ अरविंद, माजी प.स.सभापती अजित माने, आंबादास जाधव, पंकज शेळके आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना सूर्यवंशी म्हणाले हमीद शेख यांना नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. या संधीचे सोने करुन त्यांनी नगर परिषदेमध्ये ऐतिहासीक नियोजनबध्द कार्यप्रणाली अवलंबवून सक्षमपणे भरीव असे कार्य केले. प्रत्येक वार्डामध्ये सकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान स्वतः जातीने हजर राहून नागरीकांचे प्रश्न, अडी-अडचणी जाणून घेऊन त्या तात्काळ सोडवून नागरीकांना दिलासा देण्याचे काम केले आहे.

शहरामध्ये सर्व महापुरुषांच्या जयंती दिना निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून सर्व धर्म समभावचा भाईचारा त्यांनी जोपासला. विविध समाजाच्या सामाजिक प्रश्नांच्या आंदोलनामध्ये सक्रीय सहभागी होऊन अनेक समाज बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून साथ दिली. शहरामध्ये कधीही जातीय अथवा धार्मिक तेढ निर्माण होऊ दिले नाही.

सर्व जाती-पाती धर्माच्या लोकांसोबत अत्यंत मैत्रीपुर्वक जिव्हाळ्याचे संबंध स्थापित करुन सामाजिक बांधीलकी ठेवून सतत कार्य करणारा सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांची शहरामध्ये ओळख आहे. डोक्यावर बर्फ, तोंडात साखर व कामाच्या बाबतीत पायात भिंगरी लावून काम करण्याची कार्यशैलीमुळे सर्वांना ते हवेहवेसे वाटतात. कोणताही राग नाही, कोणताही लोभ नाही कोणतीच प्रसिद्धी नाही पण निलंगा मतदारसंघ पिळून काढलेला माणूस म्हणून हमीद शेख यांच्याकडे पाहिले जाते. शासन प्रशासन आणि माणसं जोडण्याची कला त्यांच्यामध्ये आहे. अशा बहुआयामी नेतृत्वाला बळ देण्यासाठी त्यांना व त्यांच्या सोबतच्या उमेदवारांना मतदानरुपी आशिर्वाद द्यावेत असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने मतदान उपस्थित होते.

## रस्त्यांवरील खड्डेविषयक कार्यवाहीसाठी समिती गठीत

**लातूर/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक ७१/ २०१३ मधील अंतरीम अर्ज क्र. २९११९/२०२५ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशानुसार समिती गठीत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील खड्डे, मॅनहोल यामुळे होणारे अपघात, मृत्यू च्याअनुषंगाने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात मंत्रालय येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत या समितीचे सदस्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) हे असतील. तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव हे समितीचे सदस्य राहतील, असे लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता बा. मा. थोरात यांनी कळविले आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.कांबळे औषधी वैद्यकीय शास्त्र विभागाच्या परिक्षेमध्ये पुरुष विभागात राज्यामध्ये प्रथम

**लातूर/प्रतिनिधी :** येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहायक प्रा. डॉ. सदानंद कांबळे हे, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या, औषध वैद्यकीय शास्त्र विभागाच्या परिक्षेमध्ये, पुरुष विभागामध्ये राज्यामधून, गुणवत्ता यादीत प्रथम रँकने उत्तीर्ण झाले आहेत. या विशेष यशाबद्दल संविधान स्वीकृती दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी, अ. भा. समाजवादी शिक्षण हक्क सभा लातूर जिल्हा शाखेच्यावतीने, डॉ. सदानंद कांबळे यांचा शॉल, ग्रंथ व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या औषध वैद्यक शास्त्र विभागामध्ये डॉ. सदानंद कांबळे हे, सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शासनाने याच विभागातील सहयोगी प्राध्यापक पदासाठी, एम. पी. एस. सी. मार्फत दि.२४/०८/२०२५ रोजी परिक्षा घेण्यात आली होती. या राज्यस्तरीय स्पर्धा परिक्षेचा

### समाजवादी शिक्षण हक्क सभेकडून सत्कार

निकाल परवा दि.२०/११/२०२५ रोजी जाहीर करण्यात आला. सदर निकालाच्या गुणवत्ता यादीमध्ये, डॉ. सदानंद कांबळे ( एम. डी.) हे राज्यात पुरुष गटात प्रथम रँकमध्ये तर संयुक्त विभागात, ते तृतीय रँकचे यश संपादन केले आहे.

सहयोगी प्रा. डॉ. सदानंद कांबळे यांच्या या विशेष यशाबद्दल, अ. भा. समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या लातूर जिल्हा शाखेच्यावतीने, संविधान स्वीकृती दिनी सभेचे राज्य उपाध्यक्ष रामकुमार रायवाडीकर यांच्या हस्ते, डॉ. कांबळे यांना विचार शलाकाचा विशेष ग्रंथ, शॉल व गुलाब पुष्प देऊन हृद्य गौरव करण्यात आला. दरम्यान या लक्षणीय यशाबद्दल सहयोगी प्रा. डॉ. सदानंद कांबळे यांचे प्रा. डॉ. सुशीलाताई पिंपळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उत्तरेश्वर बिराजदार,



प्रा. डॉ. अशोक नारनवरे, पत्रकार शिरीषकुमार शेरखाने, प्रा. डॉ. अनिल जायभाये, शाम वरयानी, पत्रकार बाळ होळीकर, संजय व्यवहारे, शिवाजीराव पिटलेवाड, गणपतराव तेलंगे, माजी गट विकास अधिकारी डी.व्ही.वाघमारे, गोपाळतात्या चिकाटे, सरपंच माधवराव गायकवाड, प्रा. रामकिशन समुखराव, प्रा. डॉ. डी. टी. घटकार, शिवाजीराव गायकवाड चिखलीकर, अंगरदराव कांबळे, अनिरुद्ध वाघमारे, अरुण गवळी, कबीर रायवाडीकर, पंचप्पा स्वामीगुरुजी, ॲड. डी एन भालेराव, अंकुशराव कांबळे, बाबा शेख, पांडुरंग देडे, दिगंबर सुर्यवंशी, वलीसाहेब शेख आदींनी अभिनंदन केले आहे.

## विद्यार्थी हेच दैवत मानुन शिक्षकांनी ज्ञानदान करावे:डॉ.संदीपान जगदाळे

**चाकूर/प्रतिनिधी :** चाकूर विद्यार्थी हेच दैवत मानुन शिक्षकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करावे यासाठी शिक्षकांनी विविध उपक्रम राबविले पाहिजेत जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात परिवर्तन होईल यामुळे राष्ट्र उभारणी होईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय आदर्श शिक्षक डॉ.संदीपान जगदाळे यांनी केले. चाकूर येथील विश्वशांती मंदिरातील सभागृहात शनिवार दि. २२ नोव्हेंबर रोजी दुपारी २:३० वाजता रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार वितरण सोहळा, गणेश उत्सवामध्ये आदर्श गणेश उत्सव स्पर्धा घेतल्या होत्या. त्याचे बक्षीस वितरण, सप्टेंबर मध्ये रोटरी शांतता विक मध्ये जागतिक शांततेसाठी विद्यार्थ्यांचे मत अशी निबंध स्पर्धा घेतली होती. या सर्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी रोटरी क्लब ऑफ चाकूरचे अध्यक्ष डॉ. केदार पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे पोलिस म्हणून उपनिरिक्षक पंकज निळकंठे हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर रोटरीचे सचिव धनंजय चिताडे, रो.चंद्रशेखर मिरजकर,रो.विनोद नीला आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्र शिल्पकार पुरस्कार प्राप्त शिक्षक: सर्वश्री बालाजी तोटे,वैजेनाथ कोटलवार,गणेश राठोड,रामचंद्र भोजणे,उमाटे हेमाताई, जयश्री कोळसुरे,माधव कानुरे,निवेदिता तोटे,संतोष पाटील, उमाकांत चलवदे. निंबध स्पर्धा: सर्वश्री कार्तिक पोळकर, श्रुती धोंगडे, अक्षता मोरे, अक्षरा उस्तुरगे,संस्कार घाळापुरे,साक्षी वाघमारे,अनुराग कुलकर्णी, विजयालक्ष्मी पांचाळ . आदर्श गणपती पुरस्कार: प्रथम पारितोषिक ७०५१ रूपये आणि ट्रॉफी शिवदर्शन स्वामी यांच्या वतीने नवतरूण गणेश मंडळ आंबेवाडी यांना प्रदान करण्यांत आली.द्वितीय पारितोषिक ५०५१ रूपयाचे पारितोषिक आणि ट्रॉफी प्रत्येकी एकदंत गणेश मंडळ चाकूर आणि सिद्धी विनायक गणेश मंडळ चाकूर यांना तर तृतीय पारितोषिक ३०५१ रूपये आणि ट्रॉफी नवयुवक गणेश मंडळ अलगरवाडी यांना देण्यात आली.

## लातूर महानगरपालिकेमार्फत मतदार यादी पाहाण्यासाठी हेल्प डेस्क सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दिनांक १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजन करुन प्रारुप मतदार यादी तयार करुन ती दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रसिध्द करुन दिनांक ३/१२/२०२५ पर्यंत हरकती व सुचना मागविण्यात येत आहेत.

त्यासबंधीत नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, आपले नाव पाहाण्यासाठी आपल्या प्रभागाच्या क्षेत्रीय कार्यालय A, B, C, व D येथे व राज्य निवडणूक आयोग यांचे संकेतस्थळ https://mahasecvoterlist.in मध्ये Search Voterlist हे आपल्या मोबाईल किंवा संगणकावर सर्च करुन आपले नाव पहाता येईल. व आपल्या मदतीसाठी (हेल्प डेस्क) झोन निहाय कर्मचारी नेमणूक करण्यात आले आहे. तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे निवडणूक विभागात संगणकावर पहाण्यासाठी सोय करण्यात आली आहे. जास्तीत जास्त नागरीकांनी आपले नाव आपण राहत असलेल्या प्रभागाच्या मतदार यादीत आले असलेचे खात्री करुन घ्यावी व काही आक्षेप असल्यास विहीत मुदतीत दाखल करावे.

## क्रांती सूर्य...

नवपिढीस आरोथा
महात्मा फुले कथा
जीवन सार कळता
इप्सितसाध्य सर्वथा

शाळेची कवाडे बंद
नारी भटके विमुक्ता
शिक्षणज्योत उजळे
पलटून टाकी तख्ता

सावकारी छळवाद
शृंखलाबध्द अशक्ता
मंदीर प्रवेश बंदिस्त
दलीत समाज भक्ता

उच्चनीच जातीज्ञाती
छळे दुर्बला व्यवस्था
सत्य शोधक समाज
मार्गदर्शक बने संस्था

बळीराजा पिडा ग्रस्त
विवेकशून्य अनास्था
कर्जातआकंठ बुडला
ना ईलाज अत्यवस्था

अशावेळी क्रांतीसूर्य
नाथ लाभलाअनाथा
इतिहास गाई गोडवे
ध्यानात ठेवी सर्वथा

भारतरत्न कधी द्याल
नव पिढी करते पृथा
सन्मान हा पुरस्कारा
का मागणी तरी वृथा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## पन्नगेश्वर कारखान्याविरोधात मनसेचे ४ तास ठिय्या आंदोलन: २ तारखेपर्यंत चर्चा न झाल्यास वाहनांची हवा छोडो आंदोलन

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील पन्नगेश्वर शुगर मिल्स लिमिटेड कारखान्याकडून थकीत पैसे न मिळाल्यामुळे गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी कारखान्याच्या गेटवर मनसे शेतकरी सेनेच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले.

मनसे शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, कर्मचारी, तसेच ऊस वाहतूक आणि तोडणी ठेकेदार या सर्वांनी आपल्या थकीत रकमेसाठी आवाज उठवला. हे आंदोलन सकाळी ११ वाजता सुरू झाले आणि तब्बल चार तास चालले.

या कारखान्याचे पूर्वीचे व्यवस्थापन बदलल्यानंतर शेतकऱ्यांचे उसाचे पैसे, कर्मचाऱ्यांचे पगार आणि तोडणी-वाहतूक ठेकेदारांचे पैसे बुडवून फसवणूक केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. यासोबतच शेतकऱ्यांचे शेअर्सही रद्द करण्यात आले आहेत.



आंदोलनादरम्यान बोलताना संतोष नागरगोजे यांनी कारखाना प्रशासनाला दोन तारखेपर्यंत थकीत रकमा देण्याची मुदत दिली आहे. सकारात्मक चर्चा न झाल्यास २ तारखेनंतर वाहनांची हवा छोडो असा इशारा देत, यश मिळाल्याशिवाय माघार नाही, अशी आक्रमक भूमिका घेतली.

यावेळी शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनीही आंदोलकांना मार्गदर्शन केले. कारखाना प्रशासनाच्या वतीने निवेदन स्वीकारण्यात आले, तसेच पोलिस उपनिरीक्षक नंदलाल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

आम्हाला न्याय मिळाल्याशिवाय कारखाना चालू देणार नाही मला शेतकऱ्यांची व्यथा पाहावत नाही म्हणुन आदोलनात माझ्या सोबत कोणी आले किवा नाही मी मात्र शेतकऱ्याच्या बाजुने लढा देणार आणि शेवट पर्यंत लढणारच आहे.दोन तारखे पर्यंत वेळ देतो तो पर्यंत सकारात्मक चर्चा नाही झाली तर पुढील आंदोलनाची दिशा ठरवु यश मिळाल्याशिवाय माघार नाही.पानगाव परिसरातून ऊस मिळू देणार नाही आणि बाहेरुन आणलेल्या उसाच्या गाड्या कार्डाच्या पर्यंत येऊ देणार नाही. आता गनीमी काव्याने लढाई होणार .यांची कारखाना प्रशासनाने नोंद घ्यावी. संतोष नागरगोजे, मनसे शेतकरी सेना प्रदेश अध्यक्ष.

## औसा नगर परिषद निवडणूक मतदान पथकांचे द्वितीय प्रशिक्षण पूर्ण





**लातूर/प्रतिनिधी :** औसा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता ०२ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाची तयारी सुरू आहे. आज, २७ नोव्हेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे द्वितीय प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले.

औसा नगर परिषद हद्दीतील एकूण ३६ मतदान केंद्रांसाठी ५० मतदान पथके कार्यरत गठीत करण्यात आली आहेत. या सर्व पथकांतील मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी क्रमांक १, २, ३ तसेच मतमोजणी कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र विषयक तांत्रिक हाताळणी, निवडणूक साहित्याची यादी, मतदान प्रक्रियेचे टप्पे, कर्तव्य-जबाबदाऱ्या, संभाव्य त्रुटी व त्यावरील उपाय आदींबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात प्रत्यक्ष मतदान यंत्रे हाताळून प्रात्यक्षिके करण्यात आली. उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाचे संचालन निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार घनश्याम अडसूळ, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी मंगेश शिंदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मास्टर ट्रेनर सचिन डोंगरे व प्रशिक्षक श्री. नागपुरे यांनी केले. यापूर्वी २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रथम प्रशिक्षण घेण्यात आले होते.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६